# प्रकरण चार

## शिक्षण विभाग

**4.74 निवृत्ती वेतनातील अतिप्रदानाबाबत. (शासकीय फंड)**

**पंचायत समिती वाडा, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, वाडा यांनी निवृत्तीवेतन प्रदान करताना एकूण रुपये 5,16,652/- एवढे अतिप्रदान झालेले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1981 मधील नियम 116(4) (2) नुसार कुटुंब निवृत्तीवेतन अदा करणे आवश्यक असताना कुटुंब निवृत्तीवेतनधारक श्रीमती भानुभिवा गोवारी यांना दिनांक 10/10/2009 ते 30/09/2015 पर्यंत रुपये 36,819/-, प्रफुल प्रभाकर भानुशाली यांना दिनांक 10/09/2015 ते 30/09/2015 या कालावधीत रुपये 81,272/-, श्याम रामचद्र इक्कर यांना दिनांक 04/06/2010 ते 30/09/2015 या कालावधीत रुपये 1,56,415/- जादा प्रदान झालेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण, भाग चार अ, वित्त विभाग, दिनांक 27/10/2014 नुसार 3 नुसार मुख्य नियमाच्या नियम 60 मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून एकस्तर पदोन्नतीने निवृत्तीवेतनार्ह वेतनाची परिगणना करणे अनुज्ञेय नसताना 7 निवृत्तीवेतनधारकांना एकस्तर वेतन श्रेणीनुसार परिगणना केल्यामुळे रक्कम रुपये 5,16,652/- चे अतिप्रदान झालेले आहे.

3) सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित निवृत्तीवेतन अदा करण्यात आले असून त्यांच्या नोंदी पीपीओ मध्ये घेतलेल्या नाही.

4) निवृत्तीवेतनधारकांचे दरवर्षी नोव्हेंबर पेड डिसेंबर मध्ये निवृत्तीवेतनधारक हयात असल्याचे दाखले घेतलेले नाहीत.

**4.75 अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन न केल्याने शिक्षकांना वेतन व भत्त्याचे नियमबाह्य प्रदानाबाबत. (शासकीय फंड)**

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती डहाणू अंतर्गत शाळेच्या पटसंखेनुसार दिनांक 30/09/2014 रोजी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन न झाल्याने वेतनावर झालेल्या नियमबाह्य खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग पत्र क्रमांक परास/10/2007/25/वैसकक्ष,दिनांक 30/05/2007 व शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.प्रशिस/पद निश्चिती/2011/502/6798,दिनांक 03/10/2011 अन्वये 30/09/2014 च्या पटसंखेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन न झाल्यास त्यांचे वेतन शाळेवर देय होणार नाही. याची सर्व जबाबदारी संबधित अधिकाऱ्यावर राहिल, असे स्पष्ट असताना समायोजन झाले नाही. अतिरिक्त ठरलेल्या 63 शिक्षकाचा वेतनावरील खर्च निष्फळ ठरलेला आहे.

**4.76 नविन परिभाषित अंशदान, निवृत्ती वेतन योजनेबाबत. (शासकीय फंड)**

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती डहाणू अंतर्गत शिक्षण विभागातील नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक अंनियो- 1005/सेवा-4,दिनांक 31/10/2005 अन्वये दिनांक 01/11/2005 रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांकरीता नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो/1007/प्र.क्र.181/आस्था 11,दिनांक 21/05/2010 प्रमाणे अभिलेखे परिपूर्ण ठेवणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक अंनियो/1007/18/सेवा-4,दिनांक 07/07/2007 नुसार कर्मचाऱ्यांची माहिती प्राप्त करून राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना सादर करणे आवश्यक असल्याची कार्यवाही केलेली नाही.

3) कर्मचाऱ्यांची कपात केलेली अंशदानाची रक्कम संस्थेचे सममुल्य प्राप्त व्याजाबाबत जबाबदारी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडे जमा होईपर्यंत पंचायत समिती व जिल्हा परिषदेची आहे.

4) डि.सी.पी.एस वर्गणी बंद केलेल्या शिक्षकांची संख्या 165 असून ती तात्काळ जमा करण्याची कार्यवाही करावी.

### 4.77 दुर्बल घटक व अनुसुचित जाती जमातीच्या मुलींना उपस्थिती भत्ता वाटपाबाबत.

**पंचायत समिती माणगांव, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती माणगांव जिल्हा परिषद निधीतून दुर्बल घटकातील अनुसुचीत जाती जमातीच्या मुलींना उपस्थिती भत्ता वाटप करण्यात आला आहे. त्यावर रक्कम रूपये 1,13,048/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवायोजना विभाग शासन निर्णय क्रमांक- पीआरई-1091/(9614)/ प्रा.शि-1 मंत्रालय विस्तार भवन मुंबई- 32,दिनांक 10/01/1992 अन्वये उपस्थिती भत्याची रक्कम संबधित विद्यार्थीनिंना शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत सदस्यांच्या उपस्थितीत देण्यात यावी वाटप पत्रावर संबंधित उपस्थित अध्यक्षांची स्वाक्षरी घेण्यात यावी. अंबलबजावणी काटेकोरपणे करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) आपल्या तालुक्यातील प्राथमिक शाळांतील योजनेचा लाभ मिळालेल्या सर्व विद्यार्थिनी दारिद्र रेषेखालील असल्याबाबत गटशिक्षणअधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र उपलब्ध झालेले नाही.

3) लाभार्थींच्या पालकांना रक्कम प्राप्त झाली आहे की नाही याची खात्री (प्रत्यक्ष पालकांच्या रुजवाती घेऊन) त्याचा अहवाल शिक्षण विस्तार यांनी अहवालासोबत उपलब्ध केलेला नाही.

4) वाटप पत्रकात ती रक्कम मिळाल्याबद्दल संबधित लाभार्थीची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. मात्र तिच्या अधिकृत पालक यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

5) शिक्षण विस्तार अधिकारी यांचे 100 टक्के गट शिक्षण अधिकारी यांचे 50 टक्के व गट विकास अधिकारी यांचे 10 टक्के पालकांना भेट देऊन प्रत्यक्षात उपस्थिती भत्ता वाटप केल्याबाबत प्रमाणपत्र नस्ती सोबत उपलब्ध झालेले नाही.

6) सन 2014-15 अखेर रक्कम रुपये 17,442/- इतकी तरतूद शिल्लक राहिलेली आहे. सदरची रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

### 4.78 शालेय पोषण आहारातील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती महाड, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती महाड जिल्हा रायगड येथील शालेय पोषण आहाराच्या प्रयोगशाळा तपासणी अहवालाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहाराच्या लाभार्थी विदयार्थ्यांना धान्याचा पुरवठा नोव्हेंबर 2014 रोजी झाल्याचे संबंधित पुरवठादाराच्या प्राप्त देयक 126, दिनांक 27/11/2014 व 128, दिनांक 27/11/2014 वरुन दिसून येते. पंचायत समिती, महाड यांनी प्रयोगशाळेकडे ऑक्टोबर व नोव्हेंबर 2014 च्या प्राप्त धान्य पुरवठयाचे नमुने दिनांक 31/12/2014 रोजी पाठविण्यात आले. सदर जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेने दिनांक 13/02/2015 रोजी चाचणी करुन अहवाल दिनांक 21/02/2015 रोजी पंचायत समिती महाड यांस पाठविला.

उपरोक्त घडामोडींवरुन असे दिसते कि लाभार्थ्यांना लाभ कालावधी उलटून गेल्यानंतर कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांच्याकडून तपासणी करण्यात आली. शाळेतील विदयार्थ्यांना

तपासणी न केलेला पोषण आहार पुरविणे ही बाब लाभार्थी विदयार्थ्यांच्या आरोग्यदृष्टया गंभीर आहे. तसेच दिनांक 11/06/2014 रोजी शिक्षण संचालक, पुणे यांच्याबरोबर झालेल्या करारनाम्यातील अट क्र. 21 (अ) (ब) (क) प्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन लि., मुंबई या पुरवठादाराकडून शालेय पोषण आहार पंचायत समिती, महाड अंतर्गत असणाऱ्या शाळांना व इतर अनुदानातील / विनाअनुदानित शाळांना पुरविण्यात येतो.

उपरोक्त पुरवठादाराने डिसेंबर 2014 व जानेवारी 2015 या कालावधीसाठी शालेय पोषण आहारासाठी धान्याचा पुरवठा केला आहे. परंतु सदर धान्याचा पुरवठा करण्या अगोदरच 27/11/2014 रोजी उपरोक्त कालावधीची देयके पंचायत समिती महाड कार्यालयास सादर केली आहे.

पुरवठादाराने सादर केलेली देयके अधिक्षक, शालेय पोषण आहार, पंचायत समिती, महाड यांनी प्रमाणित केलेली आहेत. याबाबत संबंधिताकडून स्प्ष्टीकरण घ्यावे.

3) शालेय पोषण आहार पुरवठयाबाबत शिक्षण संचालक, पुणे यांनी दिनांक 11/06/2014 रोजी विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन लि., यांच्याशी करारनामा केला आहे. सदर पुरवठयातील अट क्र. 17 अन्वये धान्यादी मालाचा पुरवठा आदेश मिळाल्यापासून जास्तीत जास्त 20 दिवसामध्ये (शालेय कामकाजाचे दिवस गृहित धरुन) संपूर्ण पुरवठा करणे पुरवठादार बंधनकारक करण्यात आला आहे. परंतु संबंधित पुरवठादाराने धान्यादी मालाचा पुरवठा 20 दिवसांच्या विहित मुदतीत केलेला नाही. अनेकदा धान्यादी मालाच पुरवठा विहित मुदतीत झालेला नाही.

4) दिनांक 11/06/2014 रोजीच्या करारनाम्यातील अट क्र. 1 अन्वये उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर 0.5 टक्के (अर्धा टक्का) प्रती आठवडा दंड आकारणे क्रमप्राप्त आहे. सदर दंडाच्या कमाल मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

अ) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या 10 टक्के दंड आकारणे.

ब) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या 5 टक्के दंड आकारणे.

पंचायत समिती, महाड यांनी उपरोक्त 'अ' व 'ब' प्रमाणे तशी दंड आकारणे आवश्यक असताना अशा प्रकारे दंड आकारलेला नाही. याबाबत दंड आकारुन पुर्तता करावी.

**4.79 शालेय पोषण योजनेपासून लाभार्थी विदयार्थी यांना वंचित ठेवण्याबाबत.**

**पंचायत समिती म्हसळा, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती म्हसळा शासन निधीतून केलेल्या खर्चात शिक्षण विभागांतर्गत सन 2014-15 मध्ये शालेय पोषण योजनेपासून लाभार्थी विदयार्थी यांना वंचित ठेवण्यात आले आहेत, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहारासाठी धान्याची माल, तांदुळ यांचा पुरवठा करण्यासाठी विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र स्टेट को.ऑफ कंन्झुमर्स लिमीटेड मुंबई यांचेबरोबर दिनांक 11/06/2014 रोजीच्या झालेल्या करारानुसार सन 2014-15 मध्ये पुरवठा करणेचा होता, सदर करारातील अट क्रमांक 14 नुसार पुरवठादाराने प्रारंभीक दोन महिन्यासाठी व त्यांनतर शाळेस 20 दिवस पुरेल एवढया धान्य साठयाचा पुरवठा करावायाचा आहे. सदर तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा सुरळीत होईल याचे सनियंत्रण समन्वय तालुका स्तरावर गट शिक्षणाधिकारी व अधिक्षक यांनी करावाचे होते. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) शाळांना तांदुळाचा पुरवठा न झाल्यास विदयार्थ्यांना आहारापासून वंचित राहू नये यासाठी करारपत्रातील अट क्रमाक 16 नुसार तांदुळ खुल्याबाजारात वाजवी दराने खरेदी करण्यात येईल व सदरचा खर्च पुरवठादाराचे बिलाच्या 10 टक्के दंड वसूल करणे बाबत अट असतांना त्याबाबत कार्यवाही केलेली नाही. तसेच शाळांना तांदुळ धान्यादी माल पुरवठा विहीत कालावधीत केलेला नाही.

3) करारातील अट क्रमांक 19 ते 24 नुसार आवश्यक कार्यवाही केलेली नाही.

**4.80 धान्यादी मालाची तपासणी न करता लाभार्थींना शालेय पोषण आहार पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती म्हसळा, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती म्हसळा सन 2014-15 मध्ये शासन निधीतून शालेय पोषण आहार पुरविण्या संदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय पोषण आहार पुरविणारे पुरवठादार महाराष्ट्र स्टेट को-ऑफ मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई यांनी संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या बरोबर झालेल्या करारा अन्वये धान्याचा पुरवठा तपासणी करुन मगच करावयाचा आहे असे असताना पुरवठादाराने लाभार्थ्यींची तपासणी न करता धान्याचा पुरवठा केला आहे.

2) प्राप्त धान्य व साहित्याचे नमुने शिक्षण विभाग, पंचायत समितीने जा.क्र./म्हसळा/शिक्षण/वशि 1/1056/2014, दिनांक 21/12/2014 रोजी तपासणीसाठी पाठविले. पंचायत समिती, म्हसळा यांनी पाठविलेल्या धान्याची तपासणी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांनी दिनांक 13/02/2015 रोजी केली असून त्याचा अहवाल जा.क्र./जि.आ.प्रशा./631/2015,दिनांक 21/02/2015 रोजी पंचायत समिती, म्हसळा यांस पाठविण्यात आला आहे.

3) सदर कालावधीतील तांदूळ व धान्यादी पुरवठयाच्या देयकांवर दिनांक उपलब्ध नाहीत.

4) पुरवठादाराने फेब्रुवारी 2015 ते एप्रिल 2015 या कालावधीत तांदूळ व धान्यादी साहित्य पुरविले आहे. या कालावधीत पुरविलेल्या साहित्याचा तपासणी केल्याचा अहवाल शिक्षण विभाग, पंचायत समिती, म्हसळा यांच्या दप्तरी उपलब्ध झाला नाही. सदर बाबत शिक्षण उपसंचालक (प्राथमिक) पुणे यांनी विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र स्टेट को.ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड मुंबई याजबरोबर दिनांक 11/06/2014 रोजीच्या करार पत्रातील अट क्रमांक 32 नुसार पुरवठा केलेल्या मालाची तपासणी शासकिय प्रयोगशाळेतून करणे आवश्यक असताना पुरवठा दाराने उपरोक्त कालावधीत शालेय पोषण आहारातील धान्यादी मालाची तपासणी केली नसून याबाबत नियमानुसार कार्यवाही आवश्यक आहे.

**4.81 शालेय पोषण आहारासंबधीत लेख्यांबाबत.**

**पंचायत समिती म्हसळा, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती म्हसळा येथील शासन निधीतून केलेल्या खर्चातून घोसाळकर विदयालय खामगांवचे शालेय पोषण आहारसंबंधीत याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेख्यात रोखवहीतील खर्च व बँक पास बुकामधील खर्च यात रक्कम रूपये 28,119/- एवढी तफावत दिसून येते.

2) आहरीत केलेल्या खर्चाचे प्रमाणके खर्च साहित्याचा तपशील, खरेदी साहीत्याची साठा नोंदवही, विनियोग इत्यादी सर्व तपशीलाची अभीलेखे ठेवण्यात आले नाहीत. त्यामूळे खरेदी साहित्याचा विनियोग इयत्ता 5 वी ते 8 वी मधील एकूण 13+69 = 82 विदयार्थ्यांसाठीच खर्च करण्यात आल्याची खात्री देता येत नाही.

3) शालेय पोषण आहाराची चव नोंदवहीची पडताळणी केली असता निवड दोन महिन्यात फक्त सात वेळाच चव घेतल्याची दिसून येते. एकंदरीत खर्चासंबंधीचे सर्वच अभीलेखे अपूर्ण असल्याचे रोखवहीत नमुद खर्चाची खात्री करता येत नाही.

**4.82 शालेय पोषण आहार योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती मुरूड, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती मुरूड शिक्षण विभागातील शालेय पोषण आहार योजनेवर शासन निधीतून खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) केंद्रप्रमुख शिघ्रे यांनी पाठवलेल्या शाळांच्या अहवालावर सही व शिक्का घेतलेला नाही, त्यामुळे त्यांनी पाठविलेला अहवाल ग्राहय कसा समजण्यांत आला, याबाबत खुलासा करावा.

2) केंद्रप्रमुख मांडला यांनी पाठविलेल्या अहवालात (एप्रिल 14) कोणत्याही शाळेचे कामाचे दिवस नमुद केलेले नाहीत, त्यामुळे पटसंख्या व कामाचे दिवस यांचा मेळ कसा घेतला.

3) काही केंद्रातील शाळांच्या अहवालात विद्यार्थ्यांची पटसंख्या नमुद नाही अपूर्व माहितीच्या आधारे एकूण ताट संख्या कशी काढण्यांत आली.

**4.83 प्राथमिक शाळा स्तरावरील 4 टक्के सादील, पोषण आहार मानधन प्रदानातील अनियमितता**.

**पंचायत समिती खेड, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती स्तरावरुन शाळांना 4 टक्के सादील शालेय पोषण आहार अनुदान वितरित केलेले आहे. त्याबाबतची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) शाळांना प्राप्त झालेले अनुदान कोणत्या लेखाशीर्षाखाली प्राप्त झाले आहे. त्याच्या नोंदी ठेवलेल्या नाहीत.

2) स्वयंपाकी व मदतनीस यांना अदा केलेल्या मानधनाचा कालावधी लिहिलेला नाही.

3) इंधन खर्चाच्या प्रदानाच्या पावत्या सोबत जोडलेल्या नाहीत.

4) दिनांक 01/04/2014 पूर्वी शिल्लक रक्कमा तसेच, दिनांक 31/03/2015 च्या शिल्लक रक्कमा यांच्या लेखाशीर्षनिहाय, तपशीलवार नोंदी ठेवलेल्या नाहीत.

5) रक्कमा प्रदानाबाबत ग्रामशिक्षण समिती ठराव नमूद केलेला नाही. तसेच, सभा इतिवृत्त पडताळणीसाठी प्राप्त झाले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील प्रकरण 2 चे नियम 6 ते 25 प्रमाणे कार्यवाही झालेली दिसत नाही.

**4.84 4 टक्के सादील व शालेय पोषण आहार प्राप्त शासन अनुदानावरील व्याजाची रक्कम शासन सदरी जमा न केलेबाबत.**

**पंचायत समिती राजापूर, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती राजापूर शिक्षण विभाग अधिनस्त असलेल्या शाळा, केंद्र शाळांचे लेखे तपासले असता 4 टक्के सादील व शालेय पोषण आहार अनुदानावर मिळणारे व्याज शासन सदरी जमा केलेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण/1090/1675/23, दिनांक 11/05/1999 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-4127/वित्त(3), दिनांक 27/08/2002 नुसार बचत खात्यावरील शासन अनुदानावर मिळणारे व्याज शासन महसूल असल्याने, तो वित्तीय वर्षअखेर शासन सदरी जमा करणे आवश्यक आहे. परंतु, पंचायत समिती राजापूरने त्याबाबतची कार्यवाही केली नाही. तरी सदर व्याजाची रक्कम रुपये 6,015/- शासन सदरी जमा करणे आवश्यक आहे.

**4.85 केंद्रशाळा वागदे नं.1 चे सादील व शालेय पोषण आहार योजनेच्या रोख वहीतील लेखे अपूर्ण असलेबाबत.**

**पंचायत समिती कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती कणकवली कडील प्राथमिक शाळांच्या लेखापरीक्षणाचेवेळी शाळा व केंद्रशाळांचे सादिल व शालेय पोषण आहार योजनेचे लेखे तपासले असता मुख्याध्यापक केंद्रशाळा वागदे नं.1 चे सादील अनुदानाची माहे एप्रिल 2014 ते 28/03/2015 पर्यंतच्या कालावधीची रोखवही लिहून पूर्ण केलेली नाही. सदर कालावधीत बरेच आर्थिक व्यवहार झालेले आहेत. झालेल्या खर्चाबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणाचे तपासणीस उपलब्ध झालेले नाहीत. तसेच शालेय पोषण आहार योजने विषयीचे कॅशबुक अपूर्ण असून त्यामध्ये माहे एप्रिल 2014 ते 27/11/2014 पर्यंतचे झालेल्या आर्थिक व्यवहारांची नोंद घेण्यात आलेली नाही. सदर शालेय पोषण आहार योजनेचे बँक पासबुक पाहता त्यामधून वेळोवेळी पासबुकातून एकूण 33,974/- रुपये काढल्याचे दिसून येते. सदरच्या रक्कमा कोणत्या प्रयोजनार्थ काढल्या याच्या नोंदी रोख वहीमध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच त्याबाबतचे अभिलेख ही ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदर बाबत शासकिय पैशाचा अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.86 शाळांचे लेखे तपासणीस उपलब्ध न झालेबाबत.**

**पंचायत समिती कुडाळ, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती कुडाळ सन 2014-2015 शिक्षण विभागाचे शालेय पोषण आहार लेख्यांबाबत खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेली आहे.

1) शासकिय योजनेतून शालेय पोषण आहार व सादिल खर्चाबाबत एकूण 243 शाळांपैकी फक्त 18 शाळांचे लेखे तपासणीस उपलब्ध झाले.

2) शिल्लक 225 शाळांचे लेखे, नोंदवहया उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे शाळांचे लेखे दप्तरी सुस्थितीत ठेवले बाबतची खात्री करता आली नाही. त्यामुळे लेखे उपलब्ध न केलेल्या शाळांच्या लेख्यामध्ये अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.87 आदिवासी प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती तळोदा, जिल्हा नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग परिपत्रक क्रमांक पीआरटी-2000/2416/2625 प्राशि, दिनांक 06/02/2001 अन्वये 30 दिवसापेक्षा जास्त सुट्टीच्या कालावधीसाठी शिक्षकांना उन्हाळी सुटी सलग 30 दिवसापेक्षा जास्त असल्याने प्रोत्साहन भत्ता देय होत नाही. पंचायत समितीने प्रमाणक क्रमांक 6 माहे 07/2014 अन्वये माहे मे/2014 देयकातुन रुपये 6,03,857/- आदिवासी प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदान केलेला आहे. तो संबंधिताकडुन वसुल करावा.

**4.88 शालेय पोषण आहार वाटप केल्याचे तत्सम लेखे प्राप्त न झालेबाबत.**

**पंचायत समिती चाळीसगांव, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती अंतर्गत सन 2014-2015 चे शालेय पोषण आहाराबाबतचे लेखे लेखा परिक्षणास पडताळणीसाठी प्राप्त झाले नाहीत. अर्धसमास पत्र क्रमांक 3,दिनांक 06/10/2015 अन्वये, लेखी स्वरुपात मागणी करुनही शालेय पोषण आहाराचे लेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झाल्याने रक्कम रुपये 2,11,87,970/- खर्चाची सत्यता पडताळून पहाता आली नाही.

**4.89 लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न केलेबाबत.**

**पंचायत समिती राहुरी, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 44) -** महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 (1) नुसार मागणी करुनही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाहीत.

पंचायत समिती राहुरी येथील सन 2014-15 चे लेखापरीक्षण शिक्षण विभाग येथील खालील नमूद केंद्रप्रमुख व केंद्रशाळांच्या अभिलेख्यांची वारंवार तोंडी तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 (1) नुसार अर्धसमासपत्र क्रमांक 2,दिनांक 31/12/2015 अन्वये मागणी करुनही सदर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आलेले नाहीत. यामध्ये केंद्र देवळाली प्रवरा, केंद्र देसवंडी, केंद्र ताहाराबाद व त्यांचे अधिपत्याखालील एक केंद्रशाळा, केंद्र वांबारी, केंद्र कणगर, केंद्र बारागाव नांदूर व त्यांचे अधिपत्याखालील दोन केंद्रशाळा, केंद्र टाकळीमियाँ व त्यांचे अधिपत्याखालील दोन केंद्रशाळा यांचे बाबतीत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख स्तरावरील अभिलेखे उपलब्ध न झाल्याने पडताळणी करता आली नाही. त्याबाबत साधार खुलासा करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 च्या कलम 7 मधील पोटकलम (1) नुसार तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, वित्त विभाग, दिनांक 10/03/2011 अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश 2011 मधील कलम 8 नुसार करण्यांत आलेल्या सुधारणेनुसार सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन उचित कारवाई करण्यांत यावी.

**4.90 शिक्षण विभागातील केंद्र प्रमुख / पदवीधर शिक्षक, उपशिक्षक यांनी विहीत मुदतीत संगणक अर्हता धारण न केल्याने झालेल्या जादा अदाईबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती हवेली-15, शिरुर-19 व 30, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15, 19 व 30) -** पंचायत समिती, हवेली व शिरुर येथील शिक्षण विभागातील केंद्र प्रमुख / पदवीधर शिक्षक, उपशिक्षक संगणक अर्हता परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसताना अदा केलेल्या जादा वेतनवाढी याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्र.क्र.5/2001/39 दिनांक 20/07/2002 अन्वये संगणक अर्हता विहित मुदतीत धारण होणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातस/नस्ती-4/224/3 दिनांक 05/05/2007 नुसार एम.एस.सी.आय.टी. परीक्षा पास होण्यासाठी माहे डिसेंबर 2007 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. संगणक अर्हता धारण न करणा-या कर्मचा-यांचे दिनांक 01/01/2008 पासून पुढे दिलेल्या वेतनवाढीच्या अनुषंगाने वेतनवाढ व भत्ते अनुज्ञेय ठरत नाहीत. त्यानुसार अर्हता धारण न केलेल्या शिक्षकांच्या वेतनवाढी ह्या जुलै 2008 पासून थांबविणे गरजेचे असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्या अन्वये शिक्षकांना देण्यात आलेल्या वेतन व भत्यांची पंचायत समिती हवेली रक्कम रूपये 6,19,58,248/-, पंचायत समिती शिरुर येथील 29 शिक्षकांना रक्कम रुपये 32,47,870/- व पंचायत समिती शिरुर येथील 12 कर्मचाऱ्यांना रक्कम रुपये 20,01,810/- अशी एकूण रक्कम रुपये 6,72,07,928/- जादा वेतन अदाई झालेली आहे. रक्कम वसुल करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

**4.91 सुवर्ण महोत्सवी आदिवासीपूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेच्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** सन 2014-15 या लेखा परीक्षण वर्षात पंचायत समिती खेड अंतर्गत शिक्षण विभागाकडील शाळा तपासणीत आव्हाट केंद्रातील गोरेगाव प्राथमिक शाळेची शिष्यवृत्ती वाटपाची रोखनोंदवहीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) राज्यातील अनुसूचित जमातीच्या इयत्ता 1 ली ते 10 मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करणे बाबतचा आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय, दिनांक 31/05/2010 व शासन शुध्दिपत्रक क्रमांक आनिशी-2009/प्रक्र20/का.12, दिनांक 26/08/2010 मधील मुद्दा क्रमांक 4 (6) अन्वये प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी प्रकल्प यांनी शिष्यवृत्ती वाटप करण्यासाठी शैक्षणीक वर्षाच्या सुरवातीला जास्तीत जास्त 30 जून पर्यंत पात्र विदयार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या सोईनुसार कोणत्याही बँकेत खाते उघडण्याच्या सुचना दयाव्यात असे नमूद असतांना प्राथमिक शाळेच्या रोख नोंदवहीत शिष्यवृत्ती रक्कम रुपये 29,900/-वाटप केले आहे.

सदर दिनांकास वाटप केलेली शिष्यवृत्ती अरेखांकित धनादेशाद्वारे वाटप केली आहे. संबंधित पात्र लाभार्थ्यांस रक्कम मिळाल्याची लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही.

2) प्राथमिक शाळा खरोशी यांचेकडील रोख पुस्तिका तपासणीत दिनांक 08/07/2014 रोजी रक्कम रुपये 33,050/- मुख्याध्यापक यांनी नियमबाह्यरीत्या स्वयं धनादेशाने काढून शिष्यवृत्ती वाटप केलेली आहे. सदरची रक्कम विध्यार्थ्यांना मिळाल्याची पडताळणी करता आली नाही.

**4.92 शालेय पोषण आहार धान्यादी व तांदुळ वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती खेड येथील शिक्षण विभाग यांचे शालेय पोषण आहार योजनेतील तांदुळ व धान्यादी साहित्याचा शाळानिहाय पुरवठा चलने व बील यामध्ये असणा-या अनियमितता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभाग पंचायत समिती खेड अंतर्गत शालेय पोषण आहार योजनांची तांदूळ व धान्यादी साहित्याचा शाळानिहाय पुरवठा चलने तपासणीमध्ये पुरवठा केलेले साहित्य, संबंधित शिक्षकांनी स्विकारले नसतानासुध्दा त्या साहित्याच्या रकमेचे बील भरून रक्कम अदा केलेली आहे. त्यामध्ये रूपये 63,394/- एवढी

रक्कम नियमबाह्य रित्या जादा अदा झालेली आहे. सदर आकडेवारी ही एका केंद्रामधील असून अशा प्रकारे एकूण 35 केंद्र असून एकूण जिल्हा परिषदेच्या तसेच खाजगी शाळा, नगरपरिषद आळंदी व खाजगी 4 अशा 459 शाळामध्ये अशा प्रकारे अनियमितता आहे काय याची तपासणी करणे आवश्यक आहे. पुरवठादाराकडून पुरवठा चलने घेवून बील भरणे ऐवजी शाळेकडून चलने प्राप्त करून किंवा त्यावर मुख्याध्यापकां मार्फत पुरवठा केलेल्या चलनावरुन बील भरणेत आले नाही.

2) माहे जून, जुलै 2014, इयत्ता 1 ते 5 व इयत्ता 6 वी ते 8 वी या शाळांची दिनांक 05/08/2013 व 08/08/2013 नुसार पुरवठा केलेल्या चलनाच्या रकमेची अदाई मार्च 2015 मध्ये केलेली आहे. सदर देयक हे एक वर्षावरील असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 44 व 45 अन्वये मान्यता घेतलेली नाही. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 5 अन्वये बिलाची अदाई करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.93 आवश्यकतेपेक्षा जादा तांदूळा साठा केलेबाबत.**

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती खेड येथील शिक्षण विभाग यांचे शालेय पोषण आहार योजनेतील तांदुळ व धान्यादि साहित्याचा पुरवठा व साठा याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ/2010/ प्र.क्र.18/प्रशि-4, दिनांक 02/02/2011अन्वये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत खर्चाचे सुधारीत दर लागू केलेले आहेत. तसेच केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचना 2006 व केंद्र शासनाचे आदेश दिनांक 24/11/2009, दिनांक 29/04/2010 व शिक्षण संचालक प्राथमिक यांचे पत्र क्रमांक शापोआ/सुमो/2010-11/प्रशिस/303/3409, दिनांक 19/10/2010 मधील सुचनेप्रमाणे तांदूळ व धान्यादि वस्तुंचा साठा भरताना दोन महिने पुरेल एवढाच भरणे आवश्यक असताना शिवाजी विद्यालय, डेहणे यांनी 6 ते 8 या वर्गासाठी प्रती विद्यार्थी 150 ग्रॅम तांदूळ याप्रमाणे दिवसाला 28.95 किलो प्रमाणे महिना 25 दिवसांसाठी 28.95 X 25 = 723.75 किलो म्हणजेच दोन महिन्यांसाठी 1447 किलो साठा भरणे आवश्यक असताना डिसेंबर 2014 रोजीचा तांदूळ साठा 1995 किलो असताना त्याच महिन्यात 1400 किलो तांदूळ स्विकारला आहे. म्हणजेच एकूण 3395 किलो तांदूळ शिल्लक असल्याचे आढळून आले. महिन्याला 723 किलो तांदूळ आवश्यक असताना 3395 किलोचा साठा करणे ही बाब नियमबाहय आहे. तरी इतर शाळांमध्ये सुध्दा हीच वस्तुस्थिती असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत तपासणी होणे आवश्यक आहे.

**4.94 शालेय पोषण आहार प्राप्त अनुदानापेक्षा जादा खर्च.**

**पंचायत समिती पुरंदर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** पंचायत समिती पुरंदर कडील शिक्षण विभागाच्या सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या शालेय पोषण आहाराच्या प्राप्त अनुदान व खर्च अनुदान याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) 1) सन 2014-2015 मध्ये इयत्ता 1 ली ते 5 वी साठी केंद्र हिस्सा रक्कम रुपये 25,17,000/- इतके इंधन भाजीपाला अनुदान प्राप्त झाले आहे. त्यामधून रक्कम रुपये 26,12,286/- इतका खर्च झाला आहे. म्हणजे रक्कम रुपये 95,286/- इतका जादा खर्च झाला आहे. तसेच राज्य हिस्सा अनुदान रुपये 8,41,000/- प्राप्त झाले असून त्यामधून रक्कम रूपये 9,68,165/- इतका खर्च झाला आहे. म्हणजे रुपये 1,27,165/- इतका जादा खर्च झाला आहे.

2) सन 2014-2015 मध्ये केंद्र हिस्सा इयत्ता 6 वी ते 8 वी साठी रुपये 21,60,000/- इंधन भाजीपाला इतके अनुदान प्राप्त झाले आहे. म्हणजे रुपये 11,54,858/- इतका जादा खर्च झाला आहे.

3) सन 2014-2015 मध्ये केंद्र हिस्सा धान्यादी माल अनुदान 6 वी ते 8 वी साठी रक्कम रुपये 13,05,000/- इतके प्राप्त झाले आहे. त्यामधून रुपये 13,72,780/- इतका खर्च झाला आहे. म्हणजे रुपये 67,780/- इतका जादा खर्च झाला आहे. तसेच राज्य हिस्सा धान्यादी माल अनुदान रक्कम रुपये 43,50,000/- मधून रुपये

4,38,113/- इतका खर्च झाला आहे. म्हणजे रुपये 3,113/- इतका जादा खर्च झाला आहे. केंद्र हिस्सा रुपये 2,78,924/- व राज्य हिस्सा रुपये 1,30,278/- असा एकूण रुपये 4,09202/- इतका प्राप्त अनुदानापेक्षा जादा खर्च झाला आहे. सदर जादा खर्च कोणत्या निधीतून केला याबाबतची सत्यता पडताळता आली नाही.सदर खर्चास विनियोजनाद्वारे विहित कालावधीत शासनाची मान्यता घेण्यात यावी.

ब) इयत्ता 1 ली ते 5 वी व 6 वी ते 8 वी साठी इंधन, भाजीपाला तसेच धान्यादी माल,स्वयंपाकी मानधन,डाटा एन्ट्री ऑपरेटर ,शिक्षक,मुख्याध्यापक मानधन व व्यवस्थापन सनियंत्रण मूल्यमापन निधी याबाबतचे केंद्र हिस्सा रुपये 5,14,187/- व राज्य हिस्सा रुपये 3,24,267/- असे एकूण रुपये 8,38,454/- इतके अनुदान सन 2014-2015 अखेर शिल्लक असुन सदर अनुदान शासनास जमा केले नाही.

**4.95 सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना अनुदान सन 2010-11 ते 2013-14 अखेर वाटप न केलेबाबत.**

**पंचायत समिती पुरंदर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती पुरंदरचे सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे शिक्षण विभागाकडील सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना मुलींच्या शिष्यवृत्ती योजनेची महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवायोजन विभाग शासननिर्णय क्र.पी आर ई 1091 (9614 प्रा शि - 1दि.10/09/92 नुसार वेळोवेळी प्राप्त अनुदान रक्कम रुपये 1,50,000/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणे पंचायत समिती पुरंदर शिक्षण विभागास सावित्री बाई फुले दत्तक पालक योजने अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलींना रुपये 300/- प्रमाणे प्रत्येकी वाटप करण्यासाठी प्राप्त झाले होते. सदर अनुदान सन 2010-11 ते सन 2013-14 पर्यंत प्राप्त झाले आहे. परंतु संबधितांनी सदर शिष्यवृत्तीची रक्कम संबधित लाभार्थी मुलींना वाटप न करता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 52 (2) चा भंग करुन नियमबाहयता केली आहे. व खर्चाचे विनीयोजन न करता रक्कम अनामत सदरी जमा केली आहे.

2) गटविकास अधिकारी पंचायत समिती पुरंदर यांचे पत्र क्रमांक पं.स./अर्थ 344/2015, दिनांक 23/03/2015 नुसार सदर रक्कम दिनांक 31/03/2015 पुर्वी वाटप करावी. अथवा व्यपगत करावी. असे गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर यांना कळवुनही योग्य ती कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण क्र.1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे आर्थिक वर्षात मुक्त केलेल्या निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल. व त्यानंतर अखर्चित राहिलेल्या निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे / जिल्हापरीषदेकडे परत करणे बंधनकारक असताना जिल्हा परिषदेस परत केला नाही.

4) सदर अनुदान रक्कम रुपये 1,50,000/- अखर्चित राहिल्यामुळे योजनेचा विद्यार्थिनींना शिक्षणाच्या लाभापासुन वंचित रहावे लागले आहे. व त्याचा त्यांना फायदा होवु शकला नाही. तसेच सदर अनुदान नाहक गुंतुन पडल्यामुळे गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.96 शालेय पोषण आहार स्वयंपाकी तथा मदतनीस मानधन वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कोरेगांव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 37) -** पंचायत समिती कोरेगांव यांनी शालेय पोषण आहार मानधन रुपये 74,000/- शाळांच्या बँक खात्यावर वर्ग केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णयानुसार डॉ. गदगकर हायस्कुल, सातारा रोड यांना ऑक्टोबर 2014 ते मार्च 2015 पटसंख्या 398 असल्याने एकूण 16,000/- मानधन अनुज्ञेय असतांना रुपये 20000/- आदा केले आहेत. जादा रुपये 4,000/- वसूल होणे आवश्यक आहे.

2) श्री. का. वि. भंडारी, प्राथमिक विद्यालय, कोरेगांव या शाळेस पटसंख्येनुसार 8 मदतनीस पदे मान्य असतांना संबंधीत शाळेने एकाच मदतनीसाची नेमणुक करुन त्यास रुपये 1,000/- प्रतिमहिना ऐवजी नियमबाहयपणे

रुपये 8,000/- प्रतिमाहप्रमाणे मानधन आदा केलेले आहे. त्यामुळे सदर मदतनिसाची प्रती महिना 7,000/- प्रमाणे 10 महिन्यांची जादा आदाई रुपये 70,000/- मानधनाची रक्कम लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) सरस्वती विद्यालय, कोरेगांव यांची इयत्ता 5वी ची एक तुकडी विना अनुदानित आहे. सदर तुकडीस शालेय पोषण आहार मान्य नसतांना आदा केलेली रक्कम रुपये 34,711/- वसुली करणे आवश्यक आहे. तसेच तांदुळ शासनामार्फत थेट पुरविल्या जाणाऱ्या धान्यादि रकमेची स्वतंत्र परिगणना करुन वसूल करणे आवश्यक आहे.

संबंधीत विभागाने वेळोवेळी शाळांची तपासणी करुन जादा प्रदान तसेच नियमबाहय रकमा आदा होणार नाहीत. अशी कार्यवाही केलेली नाही.

### 4.97 शालेय पोषण आहार शिजवणे, एल.पी.जी.अनुदान वाटप अनियमितता.

**पंचायत समिती मिरज, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** शालेय पोषण आहार शिजवणे, एल.पी.जी.अनुदान वाटप अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

केंद्र शासनाने एल.पी.जी.वरील अनुदान रद्द केल्याने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शाळांना सन 2012-2013 मधील (दिनांक 18/09/2012 ते 31/03/2013) कालावधीत आलेल्या अतिरिक्त खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे आदेश जा.क्र.प्राशिवि/लेखा-4/वशी-शापोआ - अनुदान/2015/1653,दिनांक 31/03/2015 व जावक क्रमांक प्राशिवि/ लेखा-4/वशी-शापोआ - अनुदान /2015/1654,दिनांक31/03/2015 अन्वये मिरज गटाकरिता केंद्र व राज्य हिस्स्याची अनुक्रमे रक्कम रुपये 46,17,667/- व रक्कम रुपये 15,39,222/- अशी एकूण रक्कम रुपये 61,56,889/- प्राप्त झाली असून 14 केंद्रांना वाटप करणेसाठी दिनांक 19/05/2015 रोजी खर्च टाकली आहे.

सदर अनुदान वाटप करण्यात आले असून रक्कम रुपये 20,11,818/- लेखापरीक्षण कालावधी अखेर केंद्रप्रमुख स्तरावर शिल्लक दिसून येते. तरी शिल्लक रक्कम शासन खाती भरणा करून पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

### 4.98 आयकराची रक्कम कमी कपात केल्याबाबत.

**पंचायत समिती तासगाव, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती तासगाव कडील सौ. शारदा माधव महाडिक, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, नागाव यांचे आयकर विवरण पत्र तपासले असता आयकराची रक्कम कमी कपात केल्याचे दिसून येत आहे.

सौ.महाडिक यांचे वेतन देयकाला जोडलेल्या विवरणपत्रावरून सन 2014-2015 या आर्थिक वर्षाचे एकूण उत्पन्न 5,95,087/- इतके दिसून येते. त्यावर इतर कपाती वजा करता रक्कम रुपये 29,352/- इतका आयकर कपात करणे आवश्यक होते, परंतू त्यांच्या आयकर विवरणपत्रावरून रुपये 25,500/- इतका आयकर कपात केल्याचे दिसून येतो. तरी उर्वरित आयकराची रक्कम रुपये 29,352 - 25,500= 3,852/- व्याजासह आयकर खाती भरणा करावी.

### 4.99 शालेय पोषण आहार खर्चाबाबत. (शासन निधी).

**पंचायत समिती कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती कवठेमहांकाळ सन 2014-2015 शालेय पोषण आहार योजनेची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी देणे आवश्यक असताना गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती कवठेमहांकाळ यांनी दिले आहेत.

2) केंद्र प्रमुख यांना LPG गॅस अनुदान रक्कम रुपये 8,49,072/- प्राप्त झालेले आहे. केंद्र प्रमुखांनी शाळांना सदरचे अनुदान वाटप केल्याचा अहवाल नाही. तरी सदरचे अनुदान केंद्र प्रमुख स्तरावर शिल्लक असल्याचे दिसून येते.

3) LPG गॅस अनुदान केंद्र शासनाने बंद केले होते. तरी अनुदान देण्याबाबतचे आदेश उपलब्ध झाले नाहीत.

4) शालेय पोषण आहार अनुदान केंद्र प्रमुखाना दिले आहेत तथापी केंद्र प्रमुखाकडील कागदपत्रे (किर्द/पासबुक) उपलब्ध न झाल्याने त्यांनी रक्कमा जमा घेतलेबाबत व शाळांना अदा केल्याबाबत शाळांकडील किर्द/पासबुक उपलब्ध झाले नाहीत.

5) गटशिक्षण अधिकारी यांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना दिलेले पत्र क्रमांक पसक/आस्था3/वशी/शापोआ/1452/2015/ दिनांक 18/12/2015 नुसार कोणत्याही शाळेने मागणी केलेली नाही.

तसेच आवश्यक नसल्याबाबत लेखी कळविले आहे. तरी सदरचे अखर्चित रक्कम भरणा केलेली नाही.

**4.100 शालेय पोषण आहार गॅस अनुदान वितरीत न केलेबाबत. (हस्तांतर निधी)**

**पंचायत समिती शिराळा, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 54) -** पंचायत समिती शिराळा कडील शिक्षण विभागाचे लेखापरीक्षण करताना शिक्षण विभागाने रक्कम रुपये 17,18,253/- गॅस अनुदान वितरीत केल्याचे दिसुन आले आहे, परंतु सदर अनुदान केंद्र प्रमुखांमार्फत शाळांना वाटप न करता केंद्र प्रमुख स्तरावर शिल्लक आहे. तरी सदर अनुदान वाटप करून दाखवावे.

**4.101 हस्तांतर निधी अंतर्गत प्राप्त शालेय पोषण गॅस अनुदान वितरीत न केलेबाबत.**

**पंचायत समिती पलूस, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 54) -** पंचायत समिती पलूस येथील शिक्षण विभागाकडे सन 2013-2014 मधील शालेय पोषण गॅस अनुदान रक्कम रुपये 7,11,376/- वितरीत केले असून केंद्र प्रमुखांच्या खात्यावर जमा झाल्याचे दिसून येते परंतु केंद्र शाळा प्रमुखांनी सदरचे अनुदान शाळा निहाय वाटप केलेले नाही. त्यामुळे शासकीय अनुदानाची रक्कम विनियोगाशिवाय केंद्र शाळा प्रमुखांकडे वापरा विना पडून आहे.

**4.102 30 सप्टेंबर 2013 विद्यार्थ्यी पट नुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन न केल्याने झालेल्या वेतनावरील नाहक खर्चाबाबत.**

**पंचायत समिती भुदरगड, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती भुदरगड, यांनी 30 सप्टेंबर 2013 च्या शिक्षक निश्चितीनुसार शिक्षकांचे समायोजन विलंबाने झाल्याने सदर कालावधीत वेतनावर झालेला खर्च मान्य करता येत नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जि.प.ब-511/ प्र.क्र.54/आ 14, दिनांक 12/05/2011 प्रमाणे दरवर्षी 30 सप्टेंबर अखेर जिल्हा परिषद शाळातील विद्यार्थ्यांची पट संख्या निश्चित केल्यानंतर त्या आधारे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाची कार्यवाही 31 ऑक्टोबर अखेर करणे आवश्यक असताना भुदरगड शिक्षण विभागाकडील 4 अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनास 1 महिना 18 दिवस विलंब झाल्याने या कालावधीत वेतनावर झालेला खर्च मान्य करता येत नाही.

2) अतिरिक्त 33 मुख्याध्यापकांचे जिल्हास्तरावरुन वेळेत समायोजन झाले नसल्याने त्यांच्या वेतनावर नाहक खर्च झाला आहे. 33 अतिरिक्त मुख्याध्यापकापैकी 30 मुख्याध्यापकांचे समायोजन झाले परंतु 3 मुख्याध्यापकांचे समायोजन झाले नाही. ही बाब गंभीर आहे.

**4.103 4 टक्के सादील शिल्लके बाबत व शालेय पोषण आहाराबाबत.**

**पंचायत समिती उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती उत्तर सोलापूरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये शिक्षण विभागाकडील शाळांच्या खातेवरील रक्कम रुपये 1,03,169/- इतकी अखर्चित राहिल्याचे आढळून आलेले आहे. तसेच शालेय पोषण आहारापासून विदयार्थी वंचित राहिलेचे आढळून आलेले आहे.

1) महाराष्ट्र शासन, शिक्षण व क्रिडा विभाग, परिपत्रक क्रमांक शापोआ/शिक्षण/प्राथ./112/ 01, दिनांक 15/09/2009 नुसार तांदूळ मिळाला नाहीतर मुख्याध्यापकांनी त्वरीत कळविणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक यांना जबाबदार धरण्यांत येईल असे नमूद आहे. विदयार्थी आहारापासून वंचित राहू नये याबाबत दक्षता घेण्यांत यावी.

2) जिल्हा परिषद शाळांची 4 टक्के सादील व शालेय पोषण आहाराचे लेखापरीक्षण केले असतां दिनांक 31/03/2015 रोजी खालील प्रमाणे शाळांची रोजकिर्दीस रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येते. सदरची रक्कमेचा गोषवारा रोजकिर्दीस घेण्यांत आलेला नसल्याने शिल्लक रक्कम ही कोणत्या लेखाशिर्षाची व कधीपासून शिल्लक आहे याचा बोध होत नाही. सदर शाळांचेकडील अखर्चित रक्कम रुपये 1,03,169/- व्याजासह शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

## 4.104 शिक्षक कर्मचारी संगणक अर्हता परिक्षा विहित कालावधीमध्ये उत्तीर्ण नसताना किंवा त्यांनी तसे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर केले नसताना वेतनवाढी चालू ठेवल्याबाबत

**पंचायत समिती दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 32) -** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 अन्वये ज्यांची निवड प्रक्रिया दिनांक 01/1/2001 रोजी किंवा त्यापूर्वी पासून सुरु झालेली आहे अशा शासकीय अधिकारी/कर्मचा-यांनी नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत तसेच सध्या शासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचा-यांनी दिनांक 31/12/2007 पूर्वी परिक्षा उत्तीर्ण न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सूट देण्यात येईपर्यंतच्या कालावधीपर्यंत किंवा ते संगणक हाताळणी / वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र उपलब्ध करून देईपर्यंत वेतनवाढी रोखण्यात पात्र ठरतील. व वेतनवाढी रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही असे नमुद केलेले आहे. शिक्षकांच्या वेतनातून जादा अदाई एकूण रक्कम रुपये 2,64,454/- वसूल करण्यात यावी.

## 4.105 सप्टेंबर 2014 च्या शिक्षक निश्चितीनुसार अतिरिक्त 1 शिक्षकाचे समायोजन न केलेबाबत.

**पंचायत समिती अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती अक्कलकोट यांचे सन 2014-2015 चे लेखापरिक्षण कालावधीत शिक्षण विभागाकडील शिक्षण उपसंचालक पूणे यांनी मंजूर केलेली शिक्षकांची मंजूर आस्थापना सुची व शिक्षक निश्चीती दप्तराची तपासणी केली असता सन 2014-2015 मधील आस्थापना सुचीनुसार दिनांक 30/09/2014 चे पटसंख्येच्या आधारे केलेली शिक्षक निश्चिती व प्रत्यक्ष शाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक याबाबतची पडताळणी केली असता एकूण 20 केंद्राकडील आस्थापना सुचीमधे नमूद केले नूसार एकूण 15 अतिरिक्त शिक्षक असल्याचे आढळून आलेले आहे. सदरचे जादा शिक्षकांचे समायोजन केलेले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त नमूद केलेनूसार शिक्षण विभाग अक्कलकोट यांचेकडील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाबाबत महाराष्ट्र शासन निर्णय आदेश क्रमांक जिपदा/511/प्रक्र/54/आर-14 मंत्रालय मुंबई, दिनांक 12/05/2011 नुसार 2011 मधील अनुक्रमांक 9 मधे नमुद केले नूसार समायोजन करतांना दरवर्षी 30 सप्टेंबर रोजीच्या विद्यार्थी पटसंख्येनुसार शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांनी मंजुर केलेली माध्यम निहाय आस्थापना सुची पाहता एकुण मंजुर पदे 1240 असुन प्रत्यक्ष कार्यरत शिक्षक 1138 आहेत. म्हणजेच एकूण 117 रिक्त पदे असल्याचे दिसून येते. त्यांमुळे उपरोक्त नमूद केलेनुसार सप्टेंबर 2014 चे शिक्षक निश्चितीनुसार 15 शिक्षक अतिरिक्त ठरले असल्याने त्यांचे जिल्हा अंतर्गत समायोजन करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) उपरोक्त नमुद केलेनुसार अतिरिक्त ठरलेले 1 मुख्याध्यापक, 4 पदवीधर व 10 उप शिक्षक असे एकुण 15 शिक्षकाचे वेतनापोटी माहे नोव्हेंबर 2014 ते ऑगस्ट 2015 या लेखा परिक्षण कालावधी अखेर प्रति शिक्षक सरासरी किमान वेतन रक्कम रुपये 22,270/- प्रति महीना याप्रमाणे 15 X 10 महीने X 22,270 = 33,40,500/- नियमबाह्यपणे खर्च झालेला आहे.

3) तसेच शिक्षण विभागाकडे आर टी. ई नुसार अंशकालीन 18 पदे कार्यरत असल्याचे आढळून आले आहे. परंतु सदर पदांना शासन मान्यता असल्याची कागदोपत्री पूर्तता दाखविण्यात आलेली नाही.

**4.106 पुरवणी देयकातील अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** शिक्षण विभाग पंचायत समिती पंढरपूर यांनी प्रमाणंक क्रमांक 138 दिनांक 23/05/2014 रुपये 39,33,008/- व प्रमाणंक क्रमांक 1320,दिनांक 30/03/2015 रुपये 3,29,296/-अन्वये देयकातून 14 अप्रशिक्षित शिक्षक सेवकाना नियमित वेतनश्रेणी 5200-20200 ग्रेड वेतन रुपये 2,000/- मध्ये नियुक्ती दिल्याने पुरवणी देयकाद्वारे रक्कम आदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसुचना क्रमांक वेपूर-1209/प्र.क्र.27/सेवा-9,दिनांक 22/4/2009 मधील जोडपत्र 3 नुसार ग्रेड वेतन 2,000/- साठी सुरुवातीचे वेतन रुपये 6,460/- इतके निर्धारित करण्यात आलेले आहे. तथापि, संबधित शिक्षकांना सुरुवातीचे वेतन रुपये 6,400/- ऐवजी रुपये 8,560/- इतके दिलेले आहे. त्यामुळे मार्च 2015 अखेर संबंधित 14 शिक्षकांना रुपये 47,10,599/- झालेल्या अतिप्रदानाची वसुली करणे आवश्यक आहे.

**4.107 शाळा तपासणीत दिसुन आलेल्या अनियमितता. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती अचलपूर, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती अचलपूर अंतर्गत शाळांच्या शालेय पोषन आहार, गणवेश वाटप व शिष्यवृत्तीच्या लेख्यांची पडताळणी मध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शाळा स्तरावर शालेय व्यवस्थापन समिती ला विश्वासात न घेता खर्च केल्याचे आढळून आले. वार्षीक कृती आराखडा तयार केला नाही. वाटप करावयाच्या रकमा रेखीत धनादेशाद्वारे प्रदान करण्यात आल्या नाही.

2) शालेय पोषण आहार योजनेत आठवड्यातून किमान एकदा पुरक आहार दिल्याबाबत नोंदवह्या आढळून आल्या नाहीत.

3) शाळेतील खर्च प्रमाणकावर अध्यक्षाची स्वाक्षरी घेण्यात येत नाही.

4) वाटप करण्यात आलेल्या साहीत्याची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात येत नाही.

5) रुपये 500 पेक्षा जादा रकमेची प्रदाने ईसीएस/एनईएफ़टी द्वारे संबधीताच्या खात्यावर न करता रोखीने अदा करण्यात आली.

6) रक्कम प्रदान केल्या नंतर चुकते करुन रद्द केल्याची नोंद केली नाही.

7) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवीठा यांनी रक्कम रुपये 26,000/- च्या रक्कम प्रदान केल्यानंतर पुरवठा दाराच्या पोचपावत्या लेखापरीक्षणास सादर केल्या नाही. इंधन व भाजीपाला कोणतेही परिमाण उपप्रमाणकावर न नोंदविता मोघम स्वरुपात खरेदी केला आहे. दिनांक 20/05/2014 पुर्वीची रोखवही व पासबुक लेखापरीक्षणास सादर केले नाही त्यामुळे शिल्लक रकमेची खात्री करता आली नाही.

**4.108 मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर प्लास्टीक ताडपत्री पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती बाळापूर, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समितीने मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर प्लास्टीक ताडपत्री पुरविणे योजनेअंतर्गत रक्कम रूपये 11,97,990/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र./446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविण्यात आली नाही.

2) लाभार्थी निवड ग्रामसभेमार्फत केली असल्याबाबत ग्रामपंचायतीचे ठराव ग्रामसेवक, सरपंच यांचे दाखले जोडले नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 2001/प्र.क्र.08/04,दिनांक 20/04/2001 नुसार गरजु गरीब लाभार्थ्यांस लाभ मिळणेकरीता सुचनांचे पालन करून ग्रामसभेत निवड यादीला मान्यता घेतली नाही.

4) गावनिहाय मास्टर रजिष्टर न ठेवल्यामुळे संबंधीतांनी यापूर्वी योजनेतून लाभ घेतला नसल्याची खात्री झाली नाही.

**4.109 केंद्र प्रमुखांना नियमबाहय कायम प्रवास भत्ता प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती बाळापूर, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** केंद्र प्रमुख या पदाचा कायम प्रवास भत्त लाभासाठी समावेश नसतानांही तसेच शासनाचे कायम प्रवास भत्ता मंजूरीबाबत कोणतेही आदेश नसतांना नियमबाह्यपणे कायम प्रवास भत्ता मंजूर केलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे आदेश दिनांक 24/11/2011 नुसार रूपये 1650/- प्रमाणे केंद्र प्रमुख यांना कायमप्रवास भत्ता प्रदान केले परंतु महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक 14/07/2008 मध्ये कायम प्रवास भत्ता प्रदानाबाबत उल्लेख नाही. सदर परिपत्रकाचा कायम प्रवास भत्ता लाभविषयी कोणताही संबंधी नसतांना सदर परिपत्रकाचा संदर्भ नमुद करून कायम प्रवास भत्ता मंजूर केलेला आहे.

2) वित्त विभागाचे शासन निर्णय दिनांक 02/03/2010 अन्वये या पदास कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय नसतांना 12 महिन्याची रूपये 1650/- प्रमाणे रूपये 138600/- संबंधितांकडून वसुल करून योग्य लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.

**4.110 केंद्र प्रमुख यांना नियमबाहयपणे कायम प्रवास भत्याचे शोधन करीत असल्याबाबत.**

**पंचायत समिती वाशिम, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7)** - पंचायत समिती वाशिम यांनी सन 2014-15 मध्ये केंद्र प्रमुख यांना दरमहा 1,650/- प्रमाणे कायम प्रवास भत्ता अदा केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) केंद्र प्रमुख हे पद कायम प्रवास भत्त्यात समाविष्ट नाही.

2) आयुक्त तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांचे पत्र क्रमांक 3999 दिनांक 24/01/2011 मध्ये नमुद संदर्भिय शासन परिपत्रक संकीर्ण 2008/प्र.क्र.244/आस्था-9 दिनांक 14/07/2008 या परिपत्रकाचा संदर्भ नमुद केलेला आहे. मात्र त्यामध्ये केंद्रप्रमुख यांना कायम प्रवास भत्ता देण्यात यावा याबाबत उल्लेख नाही.

3) प्रवास भत्तयाबाबत केंद्र प्रमुख यांनी दौरा दैनंदिनी सादर केली नसतांना कायम प्रवास भत्ता अदा करण्यात आला.

पंचायत समिती अंतर्गत 11 केंद्र प्रमुखांना दरमहा अदा केलेली रक्कम रुपये 2,37,600/- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.111 दिर्घ रजा कालावधीत आदिवासी प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदान केल्याबाबत.**

**पंचायत समिती कळंब, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात पंचायत समिती कळंब अंतर्गत शिक्षक कर्मचा-यांना दिर्घकालावधीत आदिवासी प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय नसतांना सर्कलमध्ये रक्कम रुपये 3,39,087/- आदिवासी प्रोत्साहन भत्याचे वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक टि.आर.एफ -2000/बक/ब्रास- मुंबई, दिनांक 06/08/2002 मधील परीच्छेद 2 (क)(3) नुसार जास्तीत जास्त एक महिण्याचा कमी कालावधीत अर्जीत रजेच्या कालावधीसाठी प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहील असे नमुद असतांना वरील महिण्याच्या माहे मे 2014, जून

2014 रजा कालावधीत हा एक महिण्यावरील असल्यामुळे दिर्घ रजा कालावधीत प्रोत्साहन भत्याची रक्कम संबधीत शिक्षकाकडुन रक्कम रुपये 3,39,085/- वसुल करुन उचित लेखाशिर्षात जमा करावी.

**4.112 अतिरीक्त ठरलेल्या शिक्षक कर्मचारी यांची समायोजन न करणे तथा त्यामुळे त्यांचे वेतनावरील निष्फळ खर्च करणेबाबत.**

**पंचायत समिती नेर, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, प्राथमिक शिक्षक संचालनालय, यांचे पत्र क्रमांक प्र.शि.क्ष/ पदनिश्चिती/2010/5502/ 3081, दिनांक 24/09/2010 नुसार तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक 53/2014,दिनांक 06/05/2014 पुर्वी अतिरीक्त ठरलेल्या 12 शिक्षकाचे 12/05/2014 पर्यंत समायोजन करणे आवश्यक असतांना 6 शिक्षकांचे दिनांक 3 महिने विलंबाने व सहायक शिक्षकाचे लेखापरीक्षण दिनांक पर्यत समायोजन करण्यात आले नाही. त्यामुळे त्याचे वेतनावर रुपये 7,48,998/- ऐवढा निष्फळ खर्च झाला आहे.

**4.113 शिक्षण विभागाअंतर्गत वार्षिक लेख्यातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जळगाव जामोद, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** शिक्षण विभागाचे सन 2014-2015 या वर्षाचे रोखपुस्तक वार्षिक लेख्यासोबत महीनानिहाय जमा खर्चाचे मासिक गोषवाऱ्याची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) माहे नोंव्हेंबर 2014 मध्ये वार्षिक लेख्यात रक्कम रुपये 9,75,000/- रुपये कमी जमा नोंदविलेले आहेत. वार्षीक लेख्यात रोख पुस्तकातील मासिक गोषवाऱ्यापेक्षा कमी जमा व रोख पुस्तकापेक्षा जादा खर्च वार्षिक लेख्यात नोंदविलेला आहे.

2) नमुना नंबर 24 व वार्षिक लेखा सोबत खर्च पडताळणी केली असता प्राथमिक शाळा वेतन योजनेत्तर लेख्यातील 2202-0173-36 मधील जुलै 24 महीन्यात नमुना नंबर 14 रक्कम रुपये 1,27,22,020/- नोंदविलेले आहेत. वार्षिक लेख्यात रक्कम रुपये 1,23,65,172/- रुपये नोंदविलेले आहेत. नमुना नंबर 14 इतकाच खर्च वार्षीक लेख्यात नोंदविणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 3,56,848/- रुपये खर्च कमी नोंदविलेला आहे. तफावत रक्कम रुपये 3,56,848/- रुपये ताळमेळ घेवुन खुलासा दर्शवावा.

3) वार्षिक लेखा जिल्हा परिषद व पंचायत समिती शिक्षण विभाग जिल्हा परिषद यांचेशी वित्त विभागाचे लेख्यांशी जुळवणी करुन अचुक असल्याबाबत वित्त विभागाकडुन प्रमाणित करुन घेतला नाही.

**4.114 वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाचे प्रदानातील अनियमितता. (शासन निधी).**

**पंचायत समिती भिवापूर, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सहायक शिक्षिका यांचे पतीचे डोळ्यावरील शस्त्रक्रियेकरिता झालेल्या उपचारावरील दाखल करण्यात आलेल्या खर्चाचे वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रदानाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी/1069/ 875/सीआर/38/आरोग्य-7,दिनांक 21/06/1997 अन्वये खाजगी रुग्णालयात लेन्स बसविण्याकरिता केलेल्या खर्चाबाबत वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक अनुज्ञेय नाही असे स्पष्ट नमुद असतांना सदर देयकावर केलेला खर्च नियमबाहय आहे.

2) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएजी/1084/ 116/सीआर-41/आरोग्य-7,दिनांक 01/03/1999 अन्वये शायकीय रुग्णालयात दाखल करुन घेतलेले नसेल तेव्हा खाजगी रुग्णालयात उपचार घेवू शकतात व त्याबाबत खर्चाचे देयक नमुना अ मध्ये सादर करतांना Emergency Certificate आवश्यक असते. परंतु सदर देयकाला जोडलेल्या Emergency Certificate वरील दिनांक उपचारा नंतरची आहे. यावरून रुग्णाला तातडीच्या उपचाराची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट होते.

3) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 मधील नियम 2(3) नुसार रुग्ण कर्मचाऱ्यावर अवलंबून असल्याबाबतचे अवलंबिता प्रमाणपत्र जोडले नाही. तरी सदर अनियमितते मुळे झालेले प्रदान वसुलपात्र आहे.

**4.115 उपस्थिती भत्ता वाटपाबाबत. (हस्तांतरण योजना).**

**पंचायत समिती वर्धा, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** शासन निधीतून उपस्थिती भत्तात्यावर रक्कम रुपये 1,72,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपस्थिती भत्ता अनुदान हे विविध प्रवर्गातील विदयार्थी याना वाटप करण्यात आले**.** विद्यार्थी उपस्थिती पत्रक व जातीचे प्रमाणपत्र लेखा परीक्षणास सादर करण्यात आले नाही**.** तसेच रक्क्म प्राप्ती बाबत पोच व मुख्याध्यापकाकडुन उपयोगिता प्रमाण पत्र सादर करण्यात आले नाही**.**

2) शिल्लक अनुदान रक्कम रुपये (23967+2881+15748) 42,596/- परत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

3) पुर्ण अनुदान वाटप करणे आवश्यक असताना किंवा विद्यार्थीसंख्ये प्रमाणे अनुदानाची मागणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही**.**

**4.116 प्राधिकार नसतांना वैद्यकीय देयक पारित करण्यामधील अनियमितता. (हस्तांतरण योजना)**

**पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा वर्धा, सन 2014 - 2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** प्रमाणक क्रमांक 977 दिनांक 11/01/2012 रक्कम 1,10,000/- अग्रीम, प्रमाणक क्रमांक 1108 दिनांक 31/03/2015 रक्कम 1,38,434/-

उपरोक्त प्रथम प्रमाणकानुसार श्री. सुभाष दा. वनकर, सहायक शिक्षक, जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा कुटकी यांनी स्वतःच्या उपचाराकरिता रक्कम रुपये 1,10,000/- चे अग्रिम उचल केले आहे. त्यानंतर यांचे रक्कम रुपये 1,38,434/- चे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक मंजूर करून उर्वरित रक्कम रुपये 28,434/- प्रदान केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक वैखप्र 2011/प्र.क्र.333/11/राकावी-2 मुंबई दिनांक 16/11/2011 नुसार रक्कम रुपये 1,00,000/- वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले असतांना उपरोक्त प्रकरणांत मा. मुख्य अधिकारी यांनी देयकास मंजुरी दिली आहे. प्राधिकार नसतांना प्रदान केलेली रक्कम रुपये 28434/- वसूल पात्र आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमएजी 1095/सी आर 45/आरोग्य 3 दिनांक 04/07/20000 चे सहपत्रातील नियम 7 अन्वये अग्रिम मंजूर झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीत अग्रिम समायोजित झाले नाही तर त्यावर घरबांधणी अग्रीमासाठी असलेल्या व्याजाच्या कमीत कमी दराने व्याज आकारण्यात यावे असे आदेश आहेत. श्री. सुभाष दा. वनकर यांना दिनांक 11/01/2012 रोजी अग्रिम दिले असून त्यांना दिनांक 10/07/2012 ला सहा महिने पूर्ण होत होतात. यामुळे दिनांक 11/07/2012 पासून अग्रिम वसूल होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत रुपये 1,10,000/- वर घरबांधणी अग्रीमाच्या व्याजदराप्रमाणे व्याज वसूल होणे आवश्यक आहे.

**4.117 वर्ग 1 ते 4 पर्यन्त शिकणा-या विद्यार्थ्यांना गणवेशवाटपा बाबत. (अभिकरण योजना).**

**पंचायत समिती सेलु, जिल्हा वर्धा, सन 2014 - 2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** वर्ग 1 ते 4 पर्यन्त शिकणा-या विद्यार्थ्यांना गणवेश वाटपा करिता रक्कम रुपये 90,000/- प्रदान केल्याचे आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामसमितीने बचत गटाकडून खरेदी केलेल्या कापडाचा दर्जा उत्कुष्ट व चांगला आहे, याबाबत शासनमान्य प्रयोगशाळेकडून तपासणीचा अहवाल प्राप्त केला नाही.

2) ग्राम शिक्षण समित्यांनी स्थानिक स्तरावर गणवेश शिलाई केल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांनी शाळांची तपासणी करुन शिवलेले गणवेश योग्य मापात असल्याचे प्रमाणीत करुन व तसा अहवाल शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, वर्धा यांना विहित कालावधीत सादर करणे आवश्यक असतांना तसा अहवाल दिसून आला नाही.

3) गणवेश वाटप करताना विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील आहेत किंवा नाही याबाबतचा पुरावा दप्तरी ठेवलेला नाही.

**4.118 सावित्रीबाई फुले कन्या शाळा पवनीचे रोखपुस्तकातील व इतर अनियमिततेबाबत. (हस्तांतरीत योजना)**

**पंचायत समिती पवनी, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती, पवनी यांनी सावित्रीबाई फुले कन्या शाळा, पवनी यांचे शालेय पोषण आहाराचे सन 2014-2015 चे रोख पुस्तक तपासण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बॅक पासबुक, खाते क्रमांक 1610 मधील नोंदीनुसार दिनांक 18/07/2014 रोजी रक्कम रुपये 68,000/- रोख स्वरुपात आहरित करुन तसेच दिनांक 28/07/2014 पर्यत नियमबाहय रीत्या स्वत:जवळ बाळगुन संबंधित पुरवठादारांना रोखीने प्रदान केलेले आहे. तसेच रोख पुस्तकांमध्ये प्रमाणकांना क्रमांक अनुक्रमांक दिलेले नाहीत. असे एकुण 6 प्रमाणक क्रमांकने रक्कम रुपये 36,973/- खर्च केले आहे.

2) दिनांक 22/07/2014 रोजी रुपये 1,108/- व दिनांक 28/07/2014 रोजी रुपये 1,802/- असे एकुण रुपये 2,910/- रोख पुस्तकामध्ये चालान क्रमांक न नोंदविता शासनास परत रक्कम नोंदविलेली आहे. सदर रक्कम रुपये 2,910/- ची चालान लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत. तसेच संपुर्ण वित्तीय वर्षात सदर अनियमितता वारंवार करण्यात आलेली आहे.

**4.119 ग्रामीण भागातील तालुकास्तरीय क्रीडा सत्राचे खेळाचे मैदान सपाटीकरणबाबत. (विहीरगाव) (सेस फंड).**

**पंचायत समिती साकोली, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, साकोलीमधील शिक्षण विभागाने स्वनिधी अंतर्गत ग्रामीण भागातील तालुकास्तरीय क्रीडा सत्राचे खेळाचे सपाटीकरणावर रुपये 22,911/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मंजुरी व तांत्रीक मंजुरीचा दिनांक नमुद न करता फक्त वर्ष नमुद केल्याने प्रथम प्रशासकीय मंजुरी दिली की तांत्रीक मंजुरी दिली याची खात्री करता आली नाही.

गटशिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या मैदान सपाटीकरणाच्या कार्यारंभ आदेशावर जावक क्रमांक व दिनांक नमुद न करता मोघमपणे कार्यारंभ आदेश दिल्याचे दिसुन येते.

2) कनिष्ठ अभियंता यांनी सदर मैदान सपाटीकरणावर 24 ट्रिप मुरुम लागल्याचे मोजमाप पुस्तिकेत नमुद केलेले आहे. परंतु तालुका कार्यवाह, स्वदेशी खेळोत्तेजक मंडळ यांनी सदर मैदान सपाटीकरणावर 48 ट्रिप मुरुम खरेदी केल्याचे दाखविलेले आहे. त्यामुळे जादा खरेदी केलेला मुरुम 24 ट्रिप रुपये 600/- प्रमाणे एकुण रुपये 14,400/- चे वसुलपात्र ठरते.

**4.120 लेखापरिक्षणात अभिलेखे सादर न करणे. (सेस फंड).**

**पंचायत समिती तुमसर, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती, तुमसरव्दारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना पिण्याचे पाण्याचे सुविधेकरीता रक्कम रुपये 4,50,000/- दिले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमास पत्र क्रमांक 6 दिनांक 13/10/2015 तसेच वारंवार मागणी करुन सुध्दा पंचायत समिती तुमसर यांनी लेखापरीक्षण वर्षात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना पिण्याचे पाण्याचे सुविधेकरीता रक्कम रुपये 4,50,000/- अनुदान दिले. याबाबत नस्ती लेखापरीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे खर्चाची सत्यता तसेच उपयोगिता प्रमाणपत्र पडताळणी करता आली नाही.

**4.121 सन 2014-2015 मध्ये शाळेचे सौंदर्यीकरणाकरीता अनुदान देणेबाबत.**

**पंचायत समिती लाखनी, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 38) -** पंचायत समिती, लाखनी मधील शिक्षण विभागाचे सन 2014-2015 मध्ये सौंदर्यीकरणाकरिता जिल्हा परिषद शाळा, पालांदुर या शाळेला रुपये 2,00,000/- अनुदान देण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, संकिर्ण 2010/275/प्रक्र 172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 अन्वये साहित्य खरेदी ई-टेंडरिंग प्रक्रिया पध्दतीने करणे आवश्यक असतांना त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) संबंधित शाळेला सौंदयीकरण करणेकरीता अनुदान देण्यात आले. परंतु नियमानुसार कामाचे प्राकलन, मोजमाप, नोंदवही, पुर्णत्वाचे प्रमाणपत्र हे लेखापरिक्षणास तपासणीकरीता उपलब्ध केलेले नाही.

3) खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी दैनिक विल्हेवाट दर्शवुन समिती व अध्यक्षाच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्याची कार्यवाही केली नाही.

**4.122 शाळाकरीता साहित्य व फर्निचर खरेदीबाबत**.

**पंचायत समिती गोंदिया, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती गोंदिया यांनी 1 विद्यालय व 2 हायस्कुलकरीता रुपये 4,42,139/- चे साहित्य व फर्निचर खरेदी केल्याबाबत खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2010/275/प्र.क्र.172/पं.रा.7, दिनांक 19/10/2011 नुसार दरकरार असल्यास त्यानुसार खरेदी करणे आवश्यक असतांना दरपत्रके बोलावून खरेदी केलेली आहे. तसेच रुपये 1,00,000/- वरील खरेदी शासन निर्देशाप्रमाणे ई-टेंडरींग नुसार करण्यात आलेली नाही.

2) रुपये 50,000/- चे खरेदी असल्याने वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा बोलविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करुन खरेदी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2012/प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 नुसार खरेदी केलेल्या साहित्याची गुणवत्ता साहित्य दर खात्री, तांत्रीक तपासणी, विहित पध्दतीने खरेदी इत्यादी बाबींचा अवलंब करुन खरेदीची कार्यवाही नाही.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/ 1000/प्र.क्र. 14, मुंबई दिनांक 11/02/2000 चे शासन निर्णयाप्रमाणे 15 फेब्रुवारीनंतर कोणतेही फर्निचर खरेदी करु नये असे असतांना फर्निचर खरेदी केलेले आहे.

**4.123 नियमबाहय वाहतुक भत्याचे प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती आमगांव, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16 व 17) -** पंचायत समिती आमगांव येथील सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात शाळेतील कार्यरत शिक्षकांना माहे मे व जून 2014 च्या वेतनात वाहतुक भत्त्यापोटी रुपये 1,67,700/- चे प्रदान झालेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वाहभ/1099/प्र.क्र.45/सेवा, मंत्रालय मुंबई दिनांक 2 मे 2013 चे स्पष्टीकरण मुददा क्रमांक 5(1) नुसार सदर महिन्यात वाहतुक भत्ता अनुज्ञेय ठरत नसतांना सदर शिक्षकांना रक्कम रुपये 1,67,700/- चे नियमबाह्य प्रदान वसुलपात्र ठरते.

**4.124 शालेय पोषण आहार योजनेतील MIS DATA ENTRY ऑन लाईन करण्याचे नियमबाहय प्रदान.**

**पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात रुपये 1,10,400/- चे नियमबाह्य प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक 416, दिनांक 04/03/2015 प्रमाणे डाटा एन्ट्री ऑपरेटर मानधनासाठी रुपये 1,15,200/- रक्कम पंचायत समितीला देण्यात आली.

2) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक जा.क्रमांक प्रा.शी./शा.पो.आ./एम.एस.आय./307/775, दिनांक 21/02/2015 प्रमाणे शालेय पोषण आहार योजनेतंर्गत एमएसआय डाटा एन्ट्री पुर्णकरणे बाबत प्रति महिना रुपये 9,600/- प्रमाणे खर्च करण्याला परवानगी देण्यात आलेली आहे.

3) कार्यालयीन आदेश क्रमांक 285, दिनांक 16/03/2015 अन्वये सौ.अर्चना जे.आकरे यांना डाटा एन्ट्रीचे काम देण्यात आले.

4) डॉटा एन्ट्री ऑपरेटर सौ.अर्चना जे. ठाकरे यांनी माहे मार्च मध्ये दिनांक 16/03/2015 पासून काम केल्याने त्यांना रुपये 4,800/- इतकी रक्कम देय ठरते. मात्र जिल्हा परिषद, गोंदिया कडून डाटा एन्ट्री कामासाठी रुपये 1,15,200/- अनुदान प्राप्त झाले म्हणून ऑपरेटरला त्यांचे फर्मला रुपये 1,15,200/- चे बिजक घेऊन त्यांचे नावे रक्कम काढण्यात आली. त्यामुळे नियमबाहयरित्या देयक पारीत केल्यामुळे रुपये 1,10,400/- जादा प्रदान झालेले आहे. शासन नुकसानीची रक्कम व्याजासह वसुल करण्यात यावी.

### 4.125 ग्रामीण भागात क्रिडा सत्र आयोजित करणे.

**पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात क्रिडा सत्रावर रुपये 25,000/- नियमबाह्य रोखीने प्रदान केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 211, दिनांक 31/03/2015 रुपये 25,000/- अन्वये उपप्रमाणकांद्वारे प्रत्येकी 1) रुपये 8,020/- 2) रुपये 7,680/- व रुपये 8,800/- खर्चाची देयके गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, देवरी यांनी स्वत: काढून रोखीने प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 29 (4) प्रमाणे रुपये 1,000/- वरील प्रदाने रेखांकित धनादेशाद्वारे करने बंधनकारक आहे. असे असतांना तशी कार्यवाही न करता रोखीने प्रदान नियमबाहय आहे.

### 4.126 नियमबाहय वाहतुक भत्याचे प्रदान.

**पंचायत समिती अर्जुनी-मोरगांव, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17, 18 व 19) -** पंचायत समिती अर्जुनी/ मोरगांव येथील सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात शाळेतील कार्यरत शिक्षकांना माहे मे व जून 2014 च्या वेतनात वाहतुक भत्यापोटी रुपये 45,800/- चे जादा प्रदान झालेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक -वाहभ/ 1099/ प्र.क्र.45/ सेवा, मंत्रालय, मुंबई, दिनांक 02 मे 2013 चे स्पष्टीकरण मुददा क्रमांक 5(1) नुसार माहे मे व जुन मध्ये शिक्षकांना वाहतुक भत्ता देय नसतांना प्रदान केलेली रक्कम रुपये 45,800/- वसुलपात्र आहे.

### 4.127 मंजुर पदापेक्षा अधिक पदे भरुन ज्यादा वेतन प्रदानाबाबत.

**पंचायत समिती वरोरा, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, वरोरा यांचे सन 2014-15 चे लेखा परीक्षण करते वेळी अर्धसमास क्रमांक 1 दिनांक 22/09/2015 नुसार पंचायत समितीमध्ये आकृतीबंधानुसार मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदामध्ये तफावत आढळुन आली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सहायक शिक्षकांची एकुण 377 पदे मंजुर असुन परंतु प्रत्यक्ष 417 शिक्षक कार्यरत आहे. याचा अर्थ 40 शिक्षक अतिरीक्त असुन 40 अतिरिक्त शिक्षकांचे वेतन नियमबाहय आहे. तरी अतिरीक्त शिक्षकांचे लवकर

समायोजन करण्यात यावे आणि 40 शिक्षकांचे दिलेल्या ज्यादा वेतनाबाबत शिक्षणाधिकारी यांचेकडुन क्षमापन आदेश मिळवावे. तोपर्यंत 40 शिक्षकांच्या वेतनावरील ज्यादा खर्च मान्य करता येणार नाही.

**4.128 शालेय पोषण आहार खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती चिमूर, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 36) -** पंचायत समिती, चिमूर यांना वर्ग 1 ते 5 व वर्ग 6 ते 8 करीता शालेय पोषण आहारासाठी प्राप्त तरतूद रक्कम रुपये 1,35,47,154/- इतकी असून त्यापैकी सन 2014 - 2015 या वित्तीय वर्षात रक्कम रुपये 1,35,33,829/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.136/प्रशि-4, दिनांक 18/06/2009 नुसार सदर योजनेअंतर्गत 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांना 450 कॅलरी उष्मांक व 2 ग्रॅम प्रथिनेयुक्त दुपारचे भोजन दयावयाचे आहे. परंतु शालेय पोषण आहाराचे शासकीय प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल नसल्याने उष्मांक व प्रथिनेयुक्त भोजन लाभार्थ्यांना दिल्याची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण् व क्रिडा विभाग, निर्णय क्रमांक शापोआ-2004/(246) प्राशि-4, दिनांक 31/03/2005 नुसार करावयाची कार्यवाही तालुका स्तर समिती, ग्रामस्तर समितीत केलेली नाही.

3) महिला बचत गटांमार्फत दुपारचे भोजन दिल्याची चलान देयकासमवेत जोडलेली नाहीत.

4) पोषण आहार देयकांची दुबार नोंदवही ठेवलेली नसल्याने कोणतेही प्रदान दुबार झाले नसल्याबाबत खात्री करता आली नाही.

5) विक्रीकराच्या नियमानुसार नोंदणीकृत पुरवठादाराच्या देयकातून 2 टक्के व बिगरनोंदणीकृत पुरवठादाराच्या/बचत गटाच्या देयकातून विक्रीकर टीडीएस कपात केल्याचे दिसुन आले नाही. तरी टिडिएस रक्कमेची परीगणना करुन सदर रक्कम सबंधिताकडुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.129 प्राथमिक शिक्षकांना सेवासातत्य प्रकरणातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बीड, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** प्राथमिक शिक्षकांना सेवासातत्य मंजुर करुन प्रदान करण्यात आले आहे व त्यावर खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेमध्ये नियुक्ती होण्यापुर्वी खाजगी शाळा तसेच संस्था मध्ये सेवा केलेला कालावधी नियमित सेवा म्हणून सेवासातत्य वेतन संरक्षण देण्यात येवून 20 शिक्षकांना रुपये 33,48,006/- तफावतीची रक्कम अदा करण्यात आली आहे.

2) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. एसएसएन-1010(277/10) माशि-2 दिनांक 15/09/2011 अन्वये प्राथमिक शाळांमध्ये विहित मार्गाने शिक्षणसेवक पदावर नियुक्ती होवून तीन वर्षे नियमित शिक्षणसेवक पदावरील समाधानकारक सेवा पुर्ण करुन नियमित शिक्षकांना व या शाळांमधील 100 टक्के अनुदान प्राप्त होणा-या नियमित शिक्षकांना नव्याने शिक्षणसेवक म्हणुन नियुक्ती न देता अटी व शर्तीच्या अधिन राहुन नियमित शिक्षक म्हणुन नियुक्ती दिली आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 89 दिनांक 05/10/2015 अन्वये सेवासातत्य दिलेल्या शिक्षकांची पुर्वीची शाळा 100 टक्के अनुदानित असलेबाबतचे अभिलेखे, नियुक्ती आदेश, अंतीम वेतन प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक अभिलेखे मागणी करुनही उपलब्ध केले नसल्याने दिलेला सेवासातत्याचा लाभ योग्य अयोग्य बाबत तपासणी करता आली नाही. सेवासातत्य आदेशामध्ये फरक देणे बाबत स्पष्ट आदेश नसतांना फरक अदा केला आहे.

3) श्रीमती कुलकर्णी यांना उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेश क्रमांक 7785 दिनांक 27/11/2012 अन्वये त्यांची पुर्वीची सेवा दिनांक 02/08/1988 पासुन नियमित करुन फरक अदा केला आहे, परंतु त्यांचे पुर्वीचे

सेवापुस्तक, विहित मार्गाने नियुक्ती झालेबाबतचे व श्रीमती कुलकर्णी हया याचिकाकर्त्या असल्याबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

**4.130 निमशिक्षकांना वाढीव मानधनापोटी झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती केज, जिल्हा बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती केज शिक्षण विभागातंर्गत निमशिक्षकांना वाढीव मानधनापोटी रुपये 38,16,000/- प्रदान केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व शिक्षा अभियान कक्ष) जिल्हा परिषद यांचे आदेश क्र. प्रनिप/प्राथ/सशि/नियुक्ती/निमशिक्षक/331 दिनांक 30/06/2013 अन्वये कंत्राटी तत्वावर निमशिक्षक म्हणून नियुक्ती देवून रुपये 3,500/- प्रमाणे मानधन देण्याबाबत आदेशीत केले होते. सदरची नियुक्ती दिनांक 01/06/2013 ते 31/03/2014 या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात होती. असे असताना संबंधीतांना रुपये 13,250/- प्रतिमाह प्रमाणे अतिरिक्त अदाई करण्यात आली आहे.

2) पंचायत समितीमध्ये देयके प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 39 चे परिशिष्ट-4 मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार देयकाचे निरिक्षण करुन तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 51 नुसार उक्त प्रदानार्थ प्राप्त देयकाचे लेखा शाखेत तपशिलवार सादर करणे, प्रदानापूर्वी त्यासाठी उपलब्ध तरतुदी, प्रदानासाठी प्राधिकार तसेच देयक सर्व बाबतीत परिपुर्ण तसेच प्रदानाच्या स्वरुपाबाबत पुरेशी माहिती अंतर्भूत असल्याची खात्री करुन देयके अदा करणे अभिप्रेत होते. परंतु पंचायत समिती स्तरावर देयके लेखाशाखेत प्राप्त झाल्यानंतर संबंधितांनी देयकाची नियमानुसार योग्य तपासणी न करताच वरील देयके प्रदानासाठी अनुदेय नसताना नियमबाहयपणे पारीत केल्याने उक्त देयकाची रक्कम रुपये 38,16,000/- सदर रक्कम संबंधीतांकडुन वसुलपात्र ठरते.

**4.131 मानधन व सादीलवार देयकांचे स्वत:चे नावे आहरण करुन वितरीत न करणेबाबत.**

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, गंगाखेड अंतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये आक्षेपमध्ये नमूद तपशिलानुसार एकूण तीन प्रमाणकांद्वारे गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड यांनी रुपये 77,540/- इतक्या रकमांची स्टेश्नरी खरेदी केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 25(2) प्रमाणे 1,000/- रुपयांहुन अधीक रक्कम दयावयाची असेल. तर, अशी रक्कम सही केलेल्या धनादेशाद्वारेच संबंधीतांस अदा करणे आवश्यक असताना. गटशिक्षण अधिकारी, गंगाखेड यांनी उपरोक्त खरेदीच्या/अदाईच्या रक्कमा स्वत:च्या नावे मागवल्या आहेत.

2) रुपये 20,000/- चे स्टेशनरी साहित्य रेणुका ट्रेडर्सचे बिजक क्रमांक 4141, दिनांक 30/03/2015 अन्वये खरेदी करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरील रक्कम महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 28 प्रमाणे संबंधीत फर्मचे नावे धनादेशाने अदा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1093/2635/उदयोग-6, दिनांक 16/07/1993 नुसार एकावेळी दर कराराव्यतिरिक्त वस्तुंची खरदी रुपये 1,000/- पेक्षा जास्त व रुपये 50,000/- पेक्षा कमी असेल अशावेळी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या वैध नोंदणीकृत पुरवठादाराकडुन दरपत्रके मागवुन खरेदी करण्यात यावीत असे नमुद आहे परंतु उक्त खरेदी करताना अशी कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

4) उक्त खरेदीचे संदर्भात लेखापरीक्षणात वारंवार तोंडी व अर्धसमासपत्र क्रमांक 18, दिनांक 05/10/2015 व क्रमांक 34, दिनांक 19/10/2015 अन्वये लेखी मागणी करुनही उक्त खरेदीचे संदर्भात साठा नोंदवही व साहित्य

वाटप नोंदवही लेखापरीक्षणास सादर केले नाही त्यामुळे सदरील साहित्य प्रत्यक्षात प्राप्त झाले किंवा कसे व संबंधीतांना वाटप केले किंवा कसे याबाबत काहीही बोध होत नाही.

5) अध्यक्ष, जिल्हा निवड प्रक्रिया समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे आदेश जावक क्रमांक जिपप/शिविप्रा/शापोआ/डेएऑ/6007/2010,दिनांक 25/10/2010 व सुधारीत आदेश क्रमांक 18072, दिनांक 10/10/2011 अन्वये गटशिक्षण अधिकारी, गंगाखेड यांचे कार्यालयातील संगणकविषयक कामे करण्यासाठी श्री क्षिरसागर रमेश श्रीरंगराव यांची डाटा एंट्री ऑपरेटर म्हणुन नेमणुक केलेली असताना उपरोक्तपणे संगणकावरील कामे केल्याबददल श्री शरद इंटरनेट कॅफे, गंगाखेड यांचे नावे रकमा मागवल्या आहेत. याबाबत स्पष्ट आदेश असताना कार्यालयाबाहेरील व्यक्तीकडुन सदरील कामे करवुन घेवुन संबंधीताच्या नावे रकमा मागवणे हि बाब योग्य नाही.

6) लेखापरीक्षणात वारंवार तोंडी व अर्धसमासपत्र क्रमांक 18, दिनांक 05/10/2015 व क्रमांक 34, दिनांक 19/10/2015 अन्वये लेखी मागणी करुनही गटशिक्षण अधिकारी कार्यालयाकडील प्राप्त धनादेश नोंदवही, किरकोळ रोखपुस्तीका, वाटप रजीष्टर व ईतर संबंधीत अभिलेखे लेखापरीक्षणात सादर केले नाहीत. त्यामुळे सदरील रकमा शासकीय लेख्याबाहेर राहील्या आहेत. याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 34, दिनांक 19/10/2015 अन्वये अवगत करुनही संबंधीत अभिलेखे सादर न केल्यामुळे या बाबत तपासणी अंती अभिप्राय देता आले नाहीत.

**4.132 पंचायत समिती पुर्णा अतंर्गत प्राथमिक शिक्षकांचे समायोजन करून त्यांना इतरत्र बदली देवुन सेवेमध्ये समायोजीत न केल्यामुळे शिक्षकांचे वेतनावर होत असलेल्या निष्फळ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** सन 2014-2015 या कालावधीचे लेखापरीक्षणात गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांना पंचायत समिती, पुर्णा अतंर्गत प्राथमिक शिक्षकांचे समायोजन विहीत कालावधीत करून त्यांना इतरत्र बदली देवुन त्यांना सेवेमध्ये समायोजीत न केल्यामुळे शिक्षकांचे वेतनावर निष्फळ खर्च होत असल्याबाबतचे अभीलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याचे अर्धसमास पत्र क्रमांक 12 दिनांक 22/12/2015 नुसार माहिती उपलब्ध करून दिली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमाक जिपब-511/प्र.क्रं.54/आ-14,दिनांक 12/05/2011 अन्वये दिनांक 30 सप्टेंबर रोजी निश्चित केलेल्या पटसंख्येनुसार अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्ये पेक्षा जास्त शिक्षक असलेल्या शाळामधुन अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा कमी शिक्षक असलेल्या शाळावर शिक्षकांचे समायोजन करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

2) समायोजन करताना दरवर्षी 30 सप्टेंबर ही तारीख विचारात घेवुन प्रचलीत नियमानुसार पटसंख्या व शिक्षक संख्या निश्चित करावी. त्या अनुषंगाने 20 आक्टोंबरपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्यतेची कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक आहे तत्पुर्वी मुदतीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांना प्रस्ताव सादर करून मान्यता घेणे आवश्यक आहे. अशी मान्यता घेतल्याचे दर्शविले नाही. तसेच समायोजनाचे काम 31 आक्टोंबर पर्यंत पुर्ण करावे, असे स्पष्ट केलेले असताना तशी कार्यवाही केल्याचे बाबतचे अभिलेखे दर्शविले नाही. अतिरिक्त पदासाठीचे वेतन आहरण होत असल्याची तपासणी अभिलेखे न दाखविल्यामुळे खर्च निरर्थक होत असल्याचे लेखापरीक्षणात स्पष्ट करता आले नाही.

3) शिक्षकांचे समायोजनापुर्वी पदोन्नतीची कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक आहे जिल्हास्तरावरून 31 जुलै पर्यंत पदोन्नतीची कार्यवाही करणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबतचे अभिलेखे दर्शविले नाही.

4) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी तालुकास्तरावरील अतिरीक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन प्रक्रीया पुर्ण करून अतिरीक्त ठरलेल्या शिक्षकांची यादी संवर्ग निहाय माहीती सादर केल्याचे कार्यवाही केल्याबाबतची लेखापरीक्षास अभिलेखे न दर्शविल्यामुळे तपासणी करता आली नाही.

**4.133 मागासवर्गीय व दारिद्र रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता वाटपामधील अनियमीतेबाबत.**

**पंचायत समिती पुर्णा, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 45) -** पंचायत समिती, पुर्णा अंतर्गत सन 2014-2015 या वित्तीय वर्षामध्ये मागासवर्गीय व दारिद्र रेषेखालील मुलींना उपस्थिती भत्ता वाटप या योजने अंतर्गत खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अक्षेपातील तपशिलामध्ये नमूद केल्या नुसार एकूण सात प्रमाणकाद्वारे वाटप केलेल्या उपस्थिती भत्याच्या देयकातील तपशिलामध्ये जातीची नोंद नमुद नाही / दारिद्र रेषा क्रमांक नमुद नाही.

2) तीन प्रमाणकाच्या मंजुरी आदेशावर गट शिक्षणाधिकारी यांच्या सहया नसतांना मागणी मंजुर करण्यात आली आहे.

**4.134 केंद्रप्रमुखांना वेतनातुन कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय नसलेबाबत.**

**पंचायत समिती कळमनुरी, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-2015 मध्ये लेखापरीक्षणात नमुद प्रमाणकान्वये केंद्रप्रमुखांना वेतन व भत्ते रक्कम रुपये 6,18,346/- प्रदान करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-101/प्र.क्र.2/सेवा-5, दिनांक 03/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार मंजुर करण्यात आलेला कायम प्रवासभत्ता कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र क्रमांक पीआरई/2012/प्र.क्र-77/प्रशि-1, दिनांक 22/03/2013 नुसार केंद्रप्रमुखांना अनुज्ञेय नसल्याने झालेले प्रदान नियमबाह्य आहे.

2) केंद्रप्रमुखांना प्रदान करण्यात आलेला प्रवासभत्ता रुपये 2,26,050/- वसुल करुन शासन खाती जमा करुन त्याची नोंद सेवापुस्तकात घेतली नाही.

3) सदर प्रदान हे केवळ सन 2014-15 मधील असून यापुर्वीही लेखापरीक्षणात आक्षेप नोंदवूनही रक्कम प्रदान केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 37(2) नुसार कार्यवाही करण्यात आली नाही. सदरबाबत नियमबाह्य प्रदान सुरु केल्यापासुनची वसुली आवश्यक आहे.

**4.135 गुजराती हायस्कूल नांदेड यांचेकडून परत केलेली शालेय पोषण आहार रक्कम रुपये 96,492/- शासन खाती जमा न करता जिल्हा परिषद उपकरमध्ये जमा केलेबाबत.**

**पंचायत समिती नांदेड, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती नांदेडचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 96,492/- जमा घेतली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील रक्कम संबधितास अदाई न करता परत का केली?

2) संबंधित रुपये 96,492/- शासनाचे ज्या लेखाशिर्षातून खर्ची पडत होती त्याच लेखाशिर्षाखाली जमा न करता जिल्हा परिषद उपकर खाती कोणत्या प्राधिकारान्वये व का जमा केली?

**4.136 केंद्र प्रमुख यांना कायम प्रवास भत्ता नियमबाहय अदाईबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रुपये 9,28,565/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक पीआईई 2012/प्र.क्रमांक77/प्रशि-1 शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दिनांक 22/3/2013 अन्वये केंद्र प्रमुख यानां कायम प्रवास भत्ता देय नाही असे स्पष्ट निर्देश असताना शासन निर्णयाचे पालन केल्याचे दिसुन येत नाही. सदर कायम प्रवास भत्ता वित्त विभागाच्या मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 383 अन्वये लागु करण्यात आलेला नाही. असे स्पष्ट असताना संबंधिताना कायम प्रवास भत्या पोटी प्रतिमहा 1,650/- प्रमाणे नियम बाहय जादा प्रदान करण्यात आले आहेत.

2) सन 2014-15 या वित्तीय वर्षात किती केंद्र प्रमुखाना कायम प्रवास भत्ता अदाई प्रदान करण्यात आला आहे या बाबत परीगणना करुन संबधिताकडुन वसूल करावे.

3) अर्ध समास पत्र क्रमांक 04 दिनांक 04/02/2016 अन्वये अभिलेख्यांची मागणी करुनही लेखापरीखणास अभिलेखे सादर करण्यात आले नाहीत.

**4.137 सहावा वेतन आयोगातील वेतनाच्या फरकाच्या 5 व्या हप्त्याची रक्कम आयकरात जमा न घेतलेबाबत.**

**पंचायत समिती भोकर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती भोकरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 68,74,269/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण 1009/प्र.क्र.70/कोशा-प्र-5,दिनांक 12/01/2010 नुसार दिनांक 01/01/2006 ते 31/03/2009 या कालावधीतील 6 व्या वेतन आयोगातील वेतनाच्या फरकाची थकबाकी 5 हप्त्यात कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा करण्यात यावेत. सदर थकबाकी रक्कमेवर लागू होत असलेली आयकराची व शैक्षणिक अधिभाराची वजावट त्यातून करता येईल असे असतांना सहाव्या वेतन आयोगाच्या 5 व्या हप्त्याच्या करपात्र रक्कमा आयकर विवरणपत्रात समाविष्ठ न करता आयकर लावण्यात आला. त्यांच्या करपात्र उत्पन्नात सदर रक्कमा समाविष्ठ करुन संबंधितांना देय असणारा आयकर वसूल करावा.

**4.138 केद्रप्रमुख यांना कायम प्रवास भत्ता देय नसताना अदाई केल्यामुळे झालेल्या जादा अदाईबाबत.**

**पंचायत समिती अर्धापुर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती अर्धापुरचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात पंचायत समिती अर्धापुर अतंर्गत गटशिक्षण अधिकारी अर्धापुर येथील कार्यरत कैंद्र प्रमुख यांना कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय नसताना रूपये 99,000/- जादा प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कायम प्रवास भत्ता वित्त विभागाच्या मुंबई नागरी सेवानियम 1959 मधील नियम 383 अन्वये लागु करण्यात आलेले नाहीत. यास्तव वित्त विभागाच्या दिनांक 3 मार्च 2010 च्या शासननिर्णयान्वये कायम प्रवास भत्याच्या दरात सुधारणा करण्यात आली असली तरी सदर दर रुपये 1650 कैंद्रप्रमुखाना लागु होत नाहीत. असे स्पष्ट असताना कायम प्रवास भत्ता प्रदान केलेले आहे.

2) सदर प्रदान नियमबाहय ठरते त्यामूळे झालेले जादा प्रदान रूपये 99,000/- वसूल करावे.

**4.139 बनावट बदली आदेश प्रकरणात श्री. कदम डी.एल, सहशिक्षक यांचेवर फौजदारी गुन्हा झालेले असताना त्या कालावधीचे वेत्तन प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती अर्धापुर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती अर्धापूरचे सन 2014-2015 मध्ये बनावट बदली आदेश प्रकरणात श्री कदम डी.एल. सह शिक्षक, यांचेवर फौजदारी गुन्हा झालेले असताना त्या कालावधीचे वेतन रक्कम रूपये 1,97,275/- प्रदान करून गंभीर अनियमितता केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री. कदम डी.एल. सहाय्यक शिक्षक, यांचे बनावट आदेश असताना पदस्थापना देणे, नैसर्गिक वर्गवाढीस शासन मंजुरी नसताना नियुक्ती आदेश देणे, नियमबाहय निमशिक्षक पदी नियुक्त करणे, बनावट बदली आदेशामुळे फौजदारी गुन्हा झालेले असताना व निलंबित असताना मागील कालावधीचे वेतन प्रदान करणे गंभीर बाब आहे.

2) बनावट आदेशान्वये कार्यरत असताना प्रदान वेतन लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही याबाबत जबाबदारी निश्चित करून रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

**4.140 प्राथमिक शिक्षकांच्या वेतनासाठी मंजूर झालेल्या अनुदानातून माध्यमिक शिक्षकांची वेतन देयके व इतर देयके नियमबाह्यरित्या आहरित केलेबाबत.**

**पंचायत समिती उमरगा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, उमरगाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात प्राथमिक शिक्षकांसाठी मंजूर झालेल्या रक्कम रुपये 60,00,000/- चे वेतन अनुदानातून माध्यमिक शिक्षकांची वेतन देयके नियमबाह्यरित्या आहरित करुन शाळांना प्रदान केलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 39 परिशिष्ट चार मधील नियम 03 (2) नुसार अर्थसंकल्पामध्ये ज्या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आली असून, व त्यानुसार अनुदाने मंजूर केली होती, त्याच बाबीबर खर्च करणे बंधनकारक आहे. परंतू याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे तरतूद वितरण आदेश 338,दिनांक 25/03/2015 नुसार रक्कम रुपये 60,00,000/- हे प्राथमिक शिक्षकांसाठीचे जानेवारी देय फेब्रुवारी 2015 व फेब्रुवारी देय मार्च 2015 चे थकित वेतन व सहाव्या वेतन आयोगाचे 01 ते 05 थकित हप्ते जमा करावे, अशा स्पष्ट सुचना दिल्या आहेत. तसेच तरतुदीपेक्षा इतर बाबीवर खर्च केला असेल, तर त्यास आपले कार्यालय जबाबदार राहील यांची गांभीर्याने नोंद घ्यावी अशा स्पष्ट सुचना दिल्या आहेत. पंचायत समितीने 22020531 हे लेखाशिर्ष बदलून 22020173 या लेखाशिर्षातून देयके आहरित केली आहेत. तरी केलेला नियमबाह्य खर्च रक्कम रुपये 15,73,790/- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.141 कुटुंब निवृत्तीवेतन अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती, तुळजापुरचे 2014-15 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणात, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या शिक्षण विभागाच्या निवृत्तीवेतन प्रदान आदेश, खर्च प्रमाणके तपासणी केली असता, दिनांक 17/03/2004 पासुन 28 निवृत्तीवेतन धारकांना जादा प्रदान झालेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन) 1982 मधील कुटुंब निवृत्तीवेतन नियम 116 मधील 4 (एक) व (दोन) नुसार, कर्मचा-याचा सेवानिवृत्तीनंतर मृत्यु झाल्यास पोट नियम (एक) नुसार निर्धारित केलेले कुटुंब निवृत्तीवेतन, सात वर्षांचा कालावधी किंवा सेवानिवृत्त कर्मचारी हयात राहिला असता तर ज्या दिनांकास 65 वर्षे वयाचा झाला असता तर त्या दिनांकापर्यंतचा कालावधी, यापैकी जो कमी असेल त्या कालावधीसाठी प्रदेय राहील. त्यानुसार, सेवेत अथवा सेवेनंतर मृत्यु झाल्यास 7 वर्षे (वाढीव दर) कुटुंब निवृत्तीवेतन 50 टक्के देय आहे. 7 वर्षांनंतर अथवा निर्धारीत तारखेनंतरच्या कालावधीसाठी (सर्वसाधारण दर) 30 टक्के अथवा किमान दराने कुटुंब निवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे. असे असतानाही वाढीव दराने पुढील कालावधीसाठी कुटुंब निवृत्तीवेतन अदा केल्याने अतिप्रदान झालेली रक्कम रुपये 66,66,348/- संबंधिताकडुन वसुल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37 (1) व (2) नुसार निवृत्तीवेतन देयकाची छाननी करण्यात आलेली नाही.

3) APP-9, 10, 12 व 14 या नोंदवह्या अद्ययावत न ठेवल्याने तसेच APP-8 (ब) यात पंचायत समिती तुळजापुरने नियमीत नोंदी न घेतल्याने निवृत्तीवेतन किती देय आहे याची खातरजमा न करता 'मागील महिन्याप्रमाणे' निवृत्तीवेतन प्रदान केल्याने अतिप्रदान झाले आहे. याबाबत प्रशासकीय चौकशी करणे आवश्यक आहे.

**4.142 शालेय पोषण आहार योजनेच्या देयकांची प्रदाने चुकीच्या लेखाशिर्षातून केलेबाबत.**

**पंचायत समिती अहमदपूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** राज्यामध्ये शालेय पोषण आहार ही योजना इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेंतर्गत इयत्ता 1 ली ते 5 वी या प्राथमिक वर्गासाठी केंद्र शासनाकडून प्रती दिन प्रती विद्यार्थ्यांसाठी 100 ग्राम व इयत्ता 6 ली ते 8 वी या उच्च प्राथमिक वर्गासाठी केंद्र शासनाकडून प्रती दिन प्रती विद्यार्थ्यांसाठी 150 ग्राम तांदूळ पुरविण्यात येतो. या

तांदुळापासून शालेय पोषण आहार तयार करण्यासाठी म्हणजेच अन्न शिजविण्यासाठी पंचायत समिती, अहमदपूर यांनी शासन निधीतून खाली दर्शविलेल्या प्रमाणकान्वये सन 2014-15 या आर्थिक वर्षात रक्कम रुपये 1,17,79,235/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2013/प्र.क्र/215/वि.वि.-3, दिनांक 06/12/2013 नुसार शालेय पोषण आहारातील अन्न शिजविण्यासाठी केंद्र शासनाचा हिस्सा (लेखाशिर्ष 22023806) व राज्य शासनाचा हिस्सा (लेखाशिर्ष 22023815) यामधील खर्चाचे प्रमाण 75:25 असे राहील. पंचायत समिती, अहमदपूरने शहरी व ग्रामीण भागातील शालेय पोषण आहारातील अन्न शिजविण्यासाठी केंद्र शासनाचा हिस्सा व राज्य शासनाचा हिस्सा यामधील खर्चाचे प्रमाण अनुक्रमे 75:25 व 25:75 प्रमाणात केलेला आहे. चुकीच्या लेखाशिर्षातून रक्कमेचे प्रदान झाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अन्न शिजविण्याच्या खर्चाचा बोजा राज्य शासनावर रक्कम रुपये 25,30,329/- जास्तीचा पडलेला असून केंद्र शासनावर मात्र रक्कम रुपये 25,30,329/- कमीचा पडलेला आहे. तरी सदरील खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. व देयकात अंकगणितीय चुकामुळे रक्कम रुपये 5,845/- जादा प्रदान झालेले आहे.

2) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट चारमधील (नियम 39) उपनियम 2 नुसार तरतूद केलेल्या निधीतून खर्च करताना ज्या प्रयोजनासाठी तरतूद केलेली आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करणे अपेक्षित असताना पंचायत समितीने चुकीच्या लेखाशिर्षातून खर्च केलेला आहे.

3) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2013/प्र.क्र/215/वि.वि.-3, दिनांक 28/10/2014 नुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्याच्या दरासाठीची प्रती दिन प्रती विद्यार्थी आहार खर्च मर्यादेचे सुधारित दर दिनांक 01 जुलै 2014 पासून लागू करण्यात आलेले आहेत. परंतु पंचायत समिती अहमदपूर पूर्वीच्या दराचेच प्रदान केलेले आहे.

4) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 37 नुसार कार्यालयाकडे करण्यात आलेली प्रत्येक मागणी तिचे पैसे चुकते करण्यापूर्वी वित्त विभागात तपासणी करण्यात येईल. परंतु अशी तपासणी न झाल्यामुळे जादा रक्कमेचे प्रदान झालेले आहे.

5) सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 37 दिनांक 20/10/2015 अन्वये विचारणा केली असता सदरील अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.

**4.143 शिक्षक समायोजनाबाबत.**

**पंचायत समिती अहमदपूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** पंचायत समिती अहमदपूर अंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालय, अहमदपूर सन 2014-15 चे 83 अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन दिनांक 13/08/2014 पर्यत झालेले नसल्यामुळे रुपये 2,88,61,071/- वेतनावर नियमबाहय खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जिप व 511/प्र.क्र.54/आ-4, दिनांक 18/05/2011 अन्वये दरवर्षी दिनांक 30 सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेतील शाळातील विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर याआधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जादा प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाची बदल्या करण्याचे आदेश दिलेले आहेत.

2) उक्त शासन निर्णयातील अनुक्रमांक 9 नुसार समायोजनाची तारीख 30 सप्टेंबर विचारात घेवून प्रचलित नियमानुसार पटसंख्या व शिक्षकांच्या संख्या निश्चित करावी. या अनुषंगाने 20 ऑक्टोंबर पर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्यतेची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदतीत प्रस्ताव सादर करूनही जर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रस्तावाला 25 ऑक्टोंबर पर्यंत कोणताही निर्णय कळविला नाही तर मान्यता गृहीत धरून कोणत्याही परिस्थितीत 31 ऑक्टोंबर पर्यंत जिल्हयातील समायोजनाचे काम पूर्ण करणे अनिवार्य आहे.

3) वरील शासन निर्णयातील अनुक्रमांक 12 मध्ये समायोजनासाठी विहीत कालावधी ठरवून दिलेला असून सदरची कार्यवाही जिल्हा परिषद अंतर्गत विहित कालावधीत होणार नाही. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमीक यांना जबाबदार धरण्याबाबतचे आदेशात नमूद केलेले आहे.

4) शासनाचे असे स्पष्ट आदेश असतांनाही मुख्य कार्यकारी अधिकारी, लातूर यांनी समायोजनाबाबत पंचायत समितीस्तरावरून तालुकाअंतर्गत समोपदेशाच्या कार्यवाहीबाबत कुठलाही पत्रव्यवहार केल्याचे संचिकेवरुन निदर्शनास आले नाही.

5) उक्त शासन निर्णयात दिनांक 31 ऑक्टोबरपर्यंत समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश असताना लेखापरीक्षण कालावधी पर्यंत समायोजनाची प्रक्रिया तालुका स्तरावर वा जिल्हा स्तरावर पूर्ण झालेली नाही. यामुळे आर्थिक वर्ष सन 2014-15 च्या लेखा परीक्षणात समायोजनाअभावी 01/11/2013 ते 13/08/2014 या कालावधीतील संबधीत प्राथमिक शिक्षक / प्राथमिक पदवीधर / मुख्याध्यापक यांचे वेतन लेखापरीक्षणात शासन अनुदानासाठी मान्य करता येत नाही.

6) सदरील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 48, दिनांक 23/10/2015 अन्वये विचारणा केली असता सदरील अर्धसमास पत्राचे उत्तर दिलेले नाही.